# वृत्तमानस

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-५१ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com




भाऊ असावा तर असा!

पान ४

## रॉबर्ट वाड्रांवर 58 कोटींच्या अवैध कमाईचा आरोप



**नवी दिल्ली -** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांच्या आरोपपत्रात दावा केला आहे की, उद्योगपती आणि काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी कथित गुन्ह्यातून ५८ कोटी रुपये कमावले. त्यांनी हे पैसे मालमत्ता खरेदी करण्यासाठी, गुंतवणूक करण्यासाठी आणि त्यांच्या समूह कंपन्यांना कर्ज देण्यासाठी आणि त्यांचे कर्ज फेडण्यासाठी वापरले. ईडीच्या मते, वाड्रा यांना ब्लू ब्रीझ ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड (BBTPL) द्वारे सुमारे ५ कोटी रुपये मिळाले. उर्वरित ५३ कोटी रुपये स्काय लाईट हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेड (SLHPL) द्वारे मिळाले.

## निवडणूक आयोगाविरोधात राहुल गांधी आक्रमक

# VoteChori.in वेबसाईटच सुरु केली



प्रतिनिधी

■ नवी दिल्ली

काँग्रेसचे खासदार व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय निवडणूक आयोगावर (ECI) निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवरून गंभीर आरोप करत नव्या आंदोलनाची सुरुवात केली आहे. त्यांनी 'मत चोरी' म्हणजेच 'Vote Chori' या नावाने एक वेबसाईट सुरू केली असून, नागरिकांनी आयोगावर दबाव टाकावा, यासाठी जनतेला आवाहन केलं आहे.

"Vote Chori ही 'एक माणूस, एक मत' या मूलभूत लोकशाही संकल्पनेवर आघात आहे," असं राहुलr गांधींनी 'X' (पूर्वीचं ट्विटर) वर म्हटलं आहे. त्यांनी म्हटले आहे की, "स्वच्छ आणि पारदर्शक मतदार यादीशिवाय निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष होऊ शकत नाहीत.

आमची मागणी स्पष्ट आहे – निवडणूक आयोगाने डिजिटल मतदार यादी जाहीर करावी, जेणेकरून जनता व राजकीय पक्ष स्वतः याची तपासणी करू शकतील." त्यांनी यासाठी http://votechori.in/ecdemand या वेबसाईटला भेट देण्याचं किंवा 9650003420 या क्रमांकावर मिस्ड कॉल देण्याचं आवाहन केलं आहे.

राहुल गांधींच्या मते, 2024 लोकसभा निवडणुकांमध्ये 'मत चोरी' झाली असून संपूर्ण प्रक्रिया 'पूर्वनियोजित' होती **पान 3 वर**

### निवडणूक आयोगाने शकुन राणी डबल व्होटर आरोप प्रकरणी बजावली नोटीस

EC Notice दोन दिवसांपूर्वी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाने भाजपाशी हात मिळवणी करत निवडणूक मॅनेज केल्याचा आरोप केला होता. अंपायरच भाजपाशी हातमिळवणी करत असेल तर काय करणार? असाही सवाल त्यांनी केला होता. दरम्यान त्यांनी शकुन राणी यांना निवडणूक आयोगाने कसं डबल व्होटर केलं हे उदाहरणासह स्पष्ट करुन दाखवलं होतं. त्यावरुन आता निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली आहे. एवढंच नाही तर राहुल गांधींचे दावे दिशाभूल करणारे आहेत असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

# भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर

## पंतप्रधान मोदींनी बंगळुरूत व्यक्त केला विश्वास

■ बंगळुरू

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता त्यांना उत्तर दिले. मोदींनी बंगळुरूमध्ये म्हटले, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आपण १० व्या क्रमांकावरून पहिल्या ५ व्या क्रमांकावर आलो आहोत. लवकरच पहिल्या ३ मध्ये येऊ. ही ताकद सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनातून आली आहे. देशाच्या कामगिरीचा झेंडा आकाशात उंच फडकत आहे.



खरं तर, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ३१ जुलै रोजी भारतावर २५% कर लादला होता आणि भारत आणि रशियाला मृत अर्थव्यवस्था म्हटले होते. ट्रम्प म्हणाले होते- भारत आणि रशियाला त्यांच्या अर्थव्यवस्थांसह बुडू द्या, मला काय फरक पडतो. याशिवाय, ऑपरेशन सिंदूरबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले- भारतीय सैनिकांची दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला गुडघे टेकण्याची क्षमता संपूर्ण जगाने पाहिली आहे. त्याच्या यशामागे आपल्या तंत्रज्ञानाची आणि मेक इन इंडियाची शक्ती आहे. बंगळुरूच्या तरुणांनीही यात मोठे योगदान दिले आहे.

पंतप्रधान आज कर्नाटक दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी बंगळुरूमधील केएसआर रेल्वे स्थानकावर ३ वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यामध्ये बंगळुरू ते बेळगाव, अमृतसर ते श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर (अजनी) ते पुणे या गाड्यांचा समावेश आहे.

पंतप्रधानांनी बंगळुरू आणि राज्यासाठी अनेक विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली. या प्रकल्पांचा एकूण खर्च २२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. पंतप्रधानांनी बंगळुरू मेट्रोच्या यलो लाईनचेही उद्घाटन केले.

# गरज पडली तर शस्त्र उचलू !

■ मुंबई



"जैन समाज हा शांतताप्रिय आहे. शस्त्र उचलणं आमचं काम नाही. परवाच्या आंदोलनात शस्त्र घेऊन आलेले लोक आमचे नव्हते. पण गरज पडली तर आम्ही धर्मासाठी शस्त्रं देखील उचलू", असा इशारा जैन मुनी निलेशचंद्र यांनी राज्य सरकारला दिला. दादर कबुतरखान्याजवळ माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

"13 ऑगस्टपासून कबुतरखाने बंद करण्याच्या निर्णयाविरोधात जैन समाज उपोषणाला बसेल. आम्ही सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग अवलंबणार आहोत. जैन समाज शांतताप्रिय आहे, शस्त्र उचलणं आमचं काम नाही. पण गरज पडली तर आम्ही धर्मासाठी शस्त्रंही उचलू. आम्ही भारताचं संविधान, न्यायालय आणि देवेंद्र फडणवीसला (एकेरी उल्लेख) मानत आहोत. पण, कोणी आमच्या धर्माच्या विरोधात गेलं तर बस्स... धर्माच्या विरोधात गेलं तर आम्ही न्यायालयालाही मानणार नाही," असं विधान जैन मुनी निलेशचंद्र यांनी केलं.

पुढं जैन मुनी निलेशचंद्र म्हणाले की, "जीव दया आमच्या धर्मात आहे. मुंगीपासून ते हत्तीपर्यंत कोणताही जीव मरता कामा नये, हे आमच्या धर्मात लिहिलं आहे. तरी देखील जैन धर्माला का लक्ष्य केलं जातंय? निवडणूक डोळ्यांसमोर ठेऊन हा सगळा प्रकार सुरु आहे. पर्युषण पर्व संपल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ. आता आम्ही शांत बसणार नाही. 13 तारखेला आम्ही उपोषण सुरु करू. मी एकटा आंदोलनाला करणार नाही, देशभरातील 10 लाख जैन बांधव इथे उपोषणाला बसतील", असा इशाराही त्यांनी दिला. तसंच, "कोणा बिल्डरसाठी महापालिका **पान 3 वर**

# युद्ध लवकरच होऊ शकतं!

## लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचं वक्तव्य

■ चेन्नई




हिंदुस्थानचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी लवकरच पाकिस्तानसोबत आणखी एक युद्ध होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, पुढील युद्ध लवकरच होऊ शकतं. आपल्याला त्यानुसार तयारी करावी लागेल आणि यावेळी आपल्याला ही लढाई एकत्र लढावी लागेल. मद्रास येथे अग्निषोध इंडियन आर्मी रिसर्च सेलच्या (IARC) उद्घाटनादरम्यान ते असं म्हणाले आहेत. याशिवाय ऑपरेशन सिंदूरबाबत जनरल द्विवेदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान सरकारने आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणाले, आम्ही ऑपरेशन दरम्यान बुद्धिबळ खेळत होतो. आम्हाला माहित नव्हते की, शत्रूची पुढची चाल काय असेल आणि आम्ही काय करणार आहोत. त्याचप्रमाणे पाकिस्तानला देखील आमची चाल माहित नव्हती.

ऑपरेशन सिंदूरबाबत बोलताना उपेंद्र द्विवेदी म्हणाले, 25 एप्रिल रोजी आम्ही नॉर्दर्न कमांडला भेट दिली. येथे आम्ही ऑपरेशनची योजना आखली, ज्यामध्ये आम्ही 9 पैकी 7 दहशतवादी अड्डे नष्ट केले, त्यात अनेक दहशतवादी मारले गेले. भारतीय लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूर दरम्यान, सरकारने आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. आम्ही ऑपरेशनमध्ये बुद्धिबळ खेळत होतो. शत्रूची पुढची चाल काय असेल आणि आम्ही काय करणार आहोत हे आम्हालाही माहित नव्हते.' आम्ही बुद्धिबळाच्या चाली **पान 3 वर**

## म ह त्वा चे

### ठाणे मॅरेथॉनपटूचा हृदयविकाराने मृत्यू



**ठाणे :** ठाणे वर्षा मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. देवाती बेन्नी असे मृत्यू झालेल्या स्पर्धकाचे नाव आहे. स्पर्धेत धावून घरी आल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ठाण्यातील हॅपी व्हॅली परिसरात राहणारे देवाती बेन्नी हे दरवर्षी वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेत होते. विशेष म्हणजे ते दररोज व्यायाम शाळेतही जात होते. वर्षा मॅरेथॉनसाठी त्यांनी विशेष मेहनतही घेतली होती. ठाणे महापालिकेने आयोजित केलेल्या ३१ व्या वर्षा मॅरेथॉन मध्ये २१ किमी स्पर्धेत त्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा आटपून ज्यावेळी ते घरी आले त्यावेळी त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. देवाती बेन्नी यांच्या मृत्यूमुळे ठाण्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे

### गडकरींनीच भाजपला उघडं पाडलंय, त्यांचेच 3.50 मतदार गायब

*काँग्रेसची टीका*

**मुंबई -** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर 'मतचोरी'चा आरोप करत भाजपवर टीका केली होती. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींची खिल्ली उडवत त्यांचे आरोप फेटाळले. मात्र, आता काँग्रेसने भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विधानाचा आधार घेत फडणवीसांवर पलटवार केला आहे. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आणि नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर नितीन गडकरी यांचा एक व्हिडिओ शेअर करत भाजपला कोंडीत पकडले आहे. या व्हिडिओत गडकरी स्वतः कबूल करताना दिसत आहेत की त्यांच्या नागपूर मतदारसंघातील साडेतीन लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती. विशेष म्हणजे यामध्ये त्यांचे नातेवाईक आणि जवळचेही होते, अशी माहिती त्यांनी दिली आहे. यशोमती ठाकूर म्हणाल्या की, ये अंतर की बात, गडकरी जी सत्य के साथ, असे म्हणत यशोमती ठाकूर यांनी X (ट्विटर) वर पोस्ट केली. त्यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिले की, राहुल गांधींना खोटं ठरवणाऱ्यांनी गडकरींचा व्हिडिओ जरूर पाहावा. आता तुमच्याच पक्षाचे नेते मतदार याद्यांतील घोळ मान्य करत आहेत.

# पवार खोटं बोलतायत... त्यांचे वरातीमागून घोडे!

## प्रकाश आंबेडकरांची बोचरी टीका

प्रतिनिधी

■ मुंबई



"शरद पवारांनी 160 जागांसंदर्भात केलेला दावा हा वराती पाठीमागून घोडे असल्यासारखे आहे. आम्ही यापूर्वी सगळ्या पक्षांना कोर्टात जाण्याचे आवाहन केले होते, पण तेव्हा कोणीही सोबत आले नाही. आता फक्त बोंबलत बसले आहेत. किती खोटे बोलावे, यालाही एक सीमा असते," अशी बोचरी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. तसेच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या 'मंडल यात्रे'वर टीका करत गंभीर आरोप केले आहेत.

शरद पवारांच्या 160 जागांच्या दाव्यासंदर्भात बोलताना म्हणाले की, हा दावा म्हणजे वरातीमागे घोडे...अशी काँग्रेसची आणि राष्ट्रवादीची परिस्थिती आहे. ईव्हीएम संदर्भात कोर्टात जाण्यासाठी आपण यापूर्वी सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी कोणीही आमच्यासोबत आले नाही. कोर्ट हे एकमेव व्यासपीठ आहे, जिथे दूध का दूध आणि पाणी का पाणी होते. आता बोंबलत बसण्याऐवजी त्यावेळीच पाऊल उचलणे गरजेचे होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, निवडणूक आयोगाच्या विरोधात कोर्टात जाण्यासाठी आपण पत्र लिहिले होते. पण त्यावेळी कोणीच सोबत उभा राहिला नाही. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली असली तरी आम्ही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तुमचा लढा खरा असेल आणि तुम्ही मोदींना घाबरत नसाल, तर तुम्ही यात सहभागी होऊ शकता, असे आवाहनही त्यांनी शरद पवारांना केले.


प्रकाश आंबेडकर यांनी राहुल गांधींना भेटण्याच्या शरद पवारांच्या दाव्यावरही सवाल केला. "राहुल गांधी विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांची नोंद ठेवली जाते. शरद पवारांसोबत दोन माणसे कोण होती, त्यांची नावे जाहीर करू शकता. सामान्य माणसाला फसवू नका. जिथे लढायचे तिथे लढायचे नाही, अशी या आघाडीची स्थिती आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

प्रकाश आंबेडकरांनी मंडल यात्रेवरूनही शरद पवारांवर आरोप केलेत. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीला राष्ट्रवादीनेच विरोध केला होता. ओबीसी समाज श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जाणार नाही, कारण श्रीमंत मराठा हा एनसीपीचा मूळ आधार आहे. त्यामुळे या यात्रेचा हेतू ओबीसींचे कल्याण नसून राजकीय गणित साधणे आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# भारत गतिमान अर्थव्यवस्था!

■ नवी दिल्ली

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातील आयातीवर 50 टक्के कर लादल्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात "मजबूत आणि गतिमान" अर्थव्यवस्था असल्याचे वर्णन केले आणि म्हटले की "सबके बॉस तो हम हैं" अशी वृत्ती असलेल्या काही देशांना ते आवडत नाही. ट्रम्प यांच्यावर हल्ला करताना राजनाथ सिंह म्हणाले की काही "बॉस" भारताच्या जलद विकास दराचा हेवा करतात आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. ते म्हणाले, "काही लोक भारताच्या जलद प्रगतीवर खूश नाहीत. त्यांना ते आवडत नाही. 'सबके बॉस तो हम हैं', मग भारत इतक्या वेगाने कसा वाढत आहे?" राजनाथ सिंह म्हणाले, "काही देशांना भारतात बनवलेले उत्पादने, भारतीय हातांनी बनवलेल्या वस्तू, इतर देशांच्या तुलनेत महाग व्हाव्यात असे वाटते,



# अमेरिकेवर प्रत्युत्तरात्मक कर लादण्याची भारताची तयारी



## काही अमेरिकन उत्पादनांवर लागू शकतं 50% पर्यंत टॅरिफ

■ नवी दिल्ली

अमेरिकेने भारतीय स्टील, ॲल्युमिनियम आणि इतर अनेक उत्पादनांवर ५०% आयात शुल्क (आयात शुल्क) लादले आहे. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, याला प्रत्युत्तर म्हणून, भारतही निवडक अमेरिकन उत्पादनांवर ५०% पर्यंत आयात शुल्क लादण्याचा विचार करत आहे.

जर असे झाले तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफवर भारताचे हे पहिलाच औपचारिक प्रत्युत्तर असेल. ट्रम्प यांनी ३१ जुलै रोजी सर्व भारतीय उत्पादनांवर २५% टॅरिफ लादला. त्यानंतर, ६ ऑगस्ट रोजी त्यांनी रशियाकडून आयात होणाऱ्या तेलावर भारतावर अतिरिक्त २५% टॅरिफ लादला.

फेब्रुवारीपासून, जेव्हा ट्रम्प प्रशासनाने या धातूंवर २५% कर लादला, तेव्हापासून स्टील आणि ॲल्युमिनियम वाद सुरू आहे. जूनमध्ये, हे शुल्क ५०% पर्यंत वाढवण्यात आले. यामुळे भारतीय निर्यातीवर किमान ७.६ अब्ज डॉलर्स किंवा ६६,५५९ कोटी रुपयांचा परिणाम झाला आहे.

भारताने जागतिक व्यापार संघटनेत (WTO) म्हटले होते की, अमेरिकेचे हे पाऊल 'राष्ट्रीय सुरक्षेच्या' नावाखाली लपवले गेले आहे, तर प्रत्यक्षात हे WTO नियमांच्या विरुद्ध असलेले सुरक्षा कर्तव्य आहे. अमेरिकेने या प्रकरणात वाटाघाटी करण्यास नकार दिला. यानंतर, भारताने आता WTO नियमांनुसार बदला घेण्याची कायदेशीर तयारी केली आहे.

# मराठा नेत्यांना फडणवीस संपवतायत...

■ हिल्यानगर



मराठा आंदोलक जरांगे पाटीलयांनी 29 ऑगस्टला 'चलो मुंबई' चा नारा दिला आहे. त्या पार्श्वभूमिवर जरांगे पाटील यांचे राज्यभर दौरे सुरू आहेत. सांगली, सातारा, कोल्हापुर नंतर आज त्यांनी आहिल्यानगर (अहमदनगर) दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकार परिषदेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाना साधला.

यावेळी भाजपमधील मराठा नेत्यांची अस्वस्थता सांगत त्यांनी खळबळ उडवून दिली. भाजपमधील अनेक मराठा नेते मला फोन करून सांगतात की त्यांना त्रास दिला जात आहे. आतापर्यंत मला 30-32 आमदार- खासदारांचे फोन आले आहेत," असा दावा केला आहे. देवेंद्र फडणवीस मराठ्यांचे नेते आणि अधिकारी संपवण्याच्या कामाला लागले आहेत, असा खळबळजनक दावा जरांगे पाटील यांनी केला आहे.

प्रत्येक मंत्र्यांना फडणवीस यांनी स्वत:चे ओएसडी दिले आहेत. भाजप वेगळा होता. पण फडणवीस यांन पक्षाची दिशा बदलली आहे. सत्तेसाठी त्यांनी नारायण राणे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण यांसारख्या अनेक नेत्यांना पक्षात घेतले. एवढेच नव्हे तर भाजपमधीलच अनेक नेते संपवण्याचे कामही सुरू आहे, असा दावा देखील जरांगे पाटील यांनी केला.

'सत्तेसाठी आपल्या लोकांना लाथा मारण्याचं काम सुरू आहे, आणि माझ्याकडे त्याची यादीही आहे. जालना, सोलापूर आणि नांदेड इथंही अनेक मराठा **पान 3 वर**

# मोदीजी, मला खोट्या आरोपात अडकवू नका!

■ नवी दिल्ली



माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचा मृत्यूपूर्वीचा एक व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. ज्यात ते थेटपणे मोदींचे नाव घेत आहेत. काही वर्षांपूर्वी मलिक यांनी एका मुलाखतीमध्येही पुलवामा दहशतवादी हल्ला हा गुप्तचर विभागाचे अपयश होते, असे म्हटले होते. जवानांना सीमेवर नेण्यासाठी खरे तर विमानाची व्यवस्था करणे आवश्यक होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहनांचा ताफा घेऊन जाणे चुकीचे होते, असे ते म्हणाले होते. तसेच 'पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला गप्प बसण्यास सांगितले होते', असेही मलिक म्हणाले होते.

सोशल मीडियावर हा व्हिडीओ ९ ऑगस्टपासून व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये सत्यपाल मलिक म्हणतात, "मोदीजी मला खोट्या आरोपात अडकवू नका. ज्या प्रकरणात मला अडकवले जात आहे, त्यात मीच तक्रारदार होतो. माझ्याकडे फक्त चार कुर्ते-पायजमे आहेत, ५-६ जोडी कपडे आणि दोन घड्याळे आहेत. हीच काय ती माझी संपत्ती. दिल्लीत एक घर आहे, एवढीच मालमत्ता. मग मला कोणत्या गोष्टीसाठी अडकवले जात आहे. तक्रारदारालाच आरोपी केले जाऊ शकत नाही. हे खूप अनैतिक आहे."

# सिंदूर महारक्तदान यात्रेत रक्तदान करण्यासाठी शिंदे पोहोचले थेट काश्मिरात

■ श्रीनगर

भारतीय सैन्यदलाच्या ९२ बेस हॉस्पीटलला भेट देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज स्वतः काश्मिरात जाऊन रक्तदान केलं आणि सिंदूर महारक्तदान यात्रेत सहभाग नोंदवला. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सैन्य दलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

सांगली येथील शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांनी या 'सिंदूर महारक्तदान यात्रे'च्या आयोजनासाठी पुढाकार घेतला असून त्यांच्यासह सांगली जिल्ह्यातील एक हजार पैलवान या यात्रेमध्ये प्रत्यक्ष सहभागी झाले आहेत. ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर भारतीय सैन्यदलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पाटील यांनी श्रीनगर येथे जाऊन रक्तदान करण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार ते आणि त्यांचे सर्व सहकारी दोन दिवसांपूर्वीच श्रीनगर येथे पोहोचले आहेत.

## भारतीय सैन्यदलाप्रती व्यक्त केली कृतज्ञता





या यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील आज श्रीनगर येथे पोहोचले. आज येथे पोहोचताच त्यांनी थेट ९२ बेस हॉस्पीटलला भेट देऊन रक्तदान केलं. यावेळी शिंदे यांच्यासोबतच चंद्रहार पाटील यांनीही रक्तदान केलं. तसेच यावेळी शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्यदलाने दाखवलेल्या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांचे देशवासियांच्यावतीने अभिनंदन करून त्यांचे आभार मानले. तसेच यावेळी सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांनी रक्तदान केल्याबद्दल शिंदे यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. तसेच शिवसेनेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिराचे आयोजन केल्याबद्दल शिंदे यांचे आभार मानले. यावेळी शिवसेनेचे चंद्रहार पाटील आणि भारतीय सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## 'तांबव्याचा विष्णूबाळा' रुपेरी पडद्यावर सयाजी शिंदे प्रमुख भूमिकेत

**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमधून वैविध्यपूर्ण भूमिका साकारत अभिनेता सयाजी शिंदे यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. प्रत्येक भूमिका अगदी लीलया साकारणारे सयाजी शिंदे यांनी त्यांच्या प्रत्येक कलाकृतीत स्वतःची वेगळी छाप उमटवली आहे. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत नुकतीच त्यांनी 'तांबव्याचा विष्णूबाळा' या चित्रपटाची घोषणा केली आहे. सातारा जिल्ह्यातील डोंगराच्या कुशीत वसलेल्या तांबवे गावातील विष्णू बाळा पाटील यांच्या संघर्षाची कथा या चित्रपटातून उलगडणार आहे. सत्यघटनेवर आधारलेल्या, रक्तरंजित संघर्षाचा नायक असलेल्या विष्णूबाळाची मध्यवर्ती भूमिका सयाजी शिंदे हे साकारणार असून मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीतील कलावंतांची मांदियाळी या भव्य चित्रपटात आपल्याला पाहायला मिळणार आहे. 'विश्वविनायक सिनेमॅटिक सफारी फिल्म एलएलपी प्रोडक्शन' बॅनरअंतर्गत येणाऱ्या 'तांबव्याचा विष्णूबाळा' या चित्रपटाचे लेखन अरविंद जगताप यांनी केले असून दिग्दर्शन अनुप जगदाळे करणार आहेत. या चित्रपटाचे निर्माते मनोहर जगताप आहेत. हा चित्रपट मराठीसोबत हिंदी, तेलुगू आणि तमिळ भाषेमध्ये प्रदर्शित होणार आहे.



## थोडक्यात

### लोकलमध्ये महिला डब्यात अश्लील वर्तन

**वसई:** मिरा भाईंदर आणि वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपायानेच महिलांच्या डब्यात मद्याच्या नशेत अश्लील गैरवर्तन केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. शनिवारी दुपारी बोरीवली ते विरार या लोकल मध्ये ही घटना घडली. अमोल सकपाळ असे या पोलीस शिपायाचे नाव असून त्याच्या विरुद्ध वसई लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई अमोल किशोर सपकाळ हा मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात कार्यरत आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास बोरिवलीवरून विरारच्या दिशेने जाणाऱ्या लोकल मध्ये तो मिरारोड स्थानकात चढला. यावेळी सकपाळ हा मद्याच्या नशेत होता. याच दरम्यान त्यांनी महिलांशी अश्लील वर्तणूक करण्यास सुरुवात केली होती.याशिवाय सीटवर बसून काही महिलांना तिकीट विचारण्याचा प्रयत्न, तसेच महिलांकडे घाणेरड्या नजरेने बघत होता. इतकेच नव्हे तर काही महिलांचे मोबाईल फोन हिसकावून घेतल्याचाही आरोप महिलांनी केला आहे. यानंतर कंटाळलेल्या महिलांनी या पोलीस शिपायाला नायगाव स्थानकात त्याला जबरदस्ती उतरवले व स्टेशन मास्तरकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर स्टेशन मास्तरने वसई रोड रेल्वे पोलिसांना बोलावून घेतले. त्यानंतर प्रवाशी महिलांनी वसई पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात वसईच्या लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रात दाखल केली आहे.

### भूत काढून देतो सांगून अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**विरार :** अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषणाच्या घटना या समोर येतच असतात. आता विरारमधून आणखी एक असेच लज्जास्पद प्रकरण समोर आले आहे. एका कथित 'भोंदू बाबा'ने एका अल्पवयीन मुलीवरील भूत काढण्याच्या बहाण्याने तीन वेळा बलात्कार केला. गुरुवारी, पीडितेच्या तक्रारीवरून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेने प्रथम अर्नाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. खटला शून्य क्रमांकावरून विरार पोलिसांकडे हस्तांतरित केल्यानंतर, महिलेचा जबाब नोंदवण्यात आला आणि गंभीर कलमांखाली एफआयआर दाखल करण्यात आला होता. आरोपी बाबाने पीडितेला भूत लागले आहे आणि ते काढण्यासाठी एक विशेष विधी करावा लागेल असे सांगून तिच्यावर तीन वेगवेगळ्या प्रसंगी बलात्कार केला,अशी तक्रार आहे. विरार पोलिसांच्या डीबी टीमने (क्राइम ब्रांच) गुरुवारी संध्याकाळी कारवाई करत नारंगी परिसरातून आरोपी 'भोंदू बाबा' आणि त्याचा साथीदार पाटील नावाच्या तरुणाला अटक केली आहे. पोलीस आरोपीची चौकशी करत आहेत आणि त्याच्याकडून इतर पीडित महिलांची माहिती मिळण्याची शक्यता आहे.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### भ्रष्टाचाराच्या दलदलीत बुडालेल्या अधिकाऱ्याची ईडी चौकशी व्हावी- जूचंद्रकर आक्रमक

# अनधिकृत बांधकामांचे माहेरघर बनले नायगाव

### सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांच्या निलंबनाची मागणी



**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार महापालिकेच्या वालीव विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांनी नायगाव पूर्व परिसरातील अनधिकृत बांधकामांना खुली मोकळीक देत विभागाचा पुरता सत्यानाश केल्याचा आरोप होत आहे. तक्रारी असूनही कारवाई टाळत, अतिक्रमण विभागाचा जेसीबी दाखवून 'अर्थपूर्ण सेटलमेंट' करण्यात या अधिकाऱ्याचा हात असल्याचा संताप जूचंद्रकरांनी व्यक्त केला आहे.

निलेश म्हात्रे हे महापालिकेतील सर्वाधिक भ्रष्ट अधिकारी असून नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांचे 'राईट हॅन्ड' असल्याचे बोलले जाते. रेड्डी यांच्या अटकेनंतर म्हात्रे यांच्या मालमत्तेची ईडीकडून चौकशी झाल्यास प्रचंड 'घबाड' उघड होईल, असा दावा नागरिकांनी केला आहे.शुक्रवारी सोमेश्वर नगर येथील अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी अतिक्रमण विभाग गेले, मात्र काही वेळातच हात हलवत परत फिरले. कारण विचारल्यावर, पावसाळ्यात लोकांना घराबाहेर काढणे योग्य नाही' असे कारण देण्यात आले. पण, संबंधित चाळींना दरवाजेच नसल्याने येथे प्रत्यक्षात कोणी राहत नाही, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे 'कारवाई थांबवण्यामागे हेतू काय?' हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**लिपिकालाही चौकशीच्या भोवऱ्यात ओढा**

वालीव विभागातील अतिक्रमण लिपिक मनोज घरत याच्यावरही फेरीवाल्यांना 'अर्थपूर्ण अभय' दिल्याचा आरोप आहे. त्याची तात्काळ चौकशी करून बदली करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**पत्रकाराच्या नावाखाली 'सुपारी' रॅकेट?**

नालासोपारा येथील एका परप्रांतीय कथित पत्रकारावरही गंभीर आरोप झाले आहेत. वालीव विभागातील अनधिकृत बांधकामांतून मोठ्या प्रमाणावर 'सुपाऱ्या' घेत असल्याची चर्चा असून, काही अधिकाऱ्यांनी या पत्रकाराला डोक्यावर बसवल्याने त्याची 'चरबी' वालीव प्रभागात वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**शिस्तभंगाची कारवाई का थांबली?**

तत्कालीन आयुक्तांनी भ्रष्टाचार आणि अनधिकृत बांधकामातील निष्काळजी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र निलेश म्हात्रे यांच्यावर वारंवार माध्यमांतून आरोप प्रसिद्ध होऊनही कारवाई न झाल्याने, 'वरिष्ठांशी संधान' असल्याचा संशय बळावला आहे.नवीन आयुक्त मनोज कुमार सूर्यवंशी यांनी निलेश म्हात्रे यांना तात्काळ निलंबित करून पालिकेतून हकालपट्टी करावी, अशी एकमुखी मागणी जूचंद्रकरांनी केली आहे.

# महामार्ग कोंडीत अडकल्या 'लाडक्या बहिणी'



**प्रतिनिधी**
■ **वसई**

### वाहतूक कोंडी सोडावा, नाहीतर कंटेनर आडवा घालू- लाडक्या बहिणी संतापल्या

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींना माहेरी जाण्याऐवजी मुंबई–अहमदाबाद महामार्गावर तासनतास कोंडीत कोंडून ठेवणाऱ्या प्रशासनावर आणि शासनावर नागरिकांनी रोष व्यक्त केला आहे. गायमुखजवळ उड्डाणपुलाच्या कामामुळे शुक्रवारीपासून महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. ऐन सणासुदीच्या काळात बहिणींना पायपीट करत घरी जावे लागले, तर काहींना घराबाहेर पडताही आले नाही. परिणामी भावाला ओवाळणी ऑनलाईन घालण्याची वेळ आली.'लाडक्या बहिणी' आता सावत्र भावासारख्या शासनावर संतापल्या असून, तात्काळ कोंडी दूर करा नाहीतर महामार्गावर कंटेनर आडवा घालू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

गायमुख रस्त्याजवळील उड्डाणपुलाचे काम ८ ऑगस्टपासून सुरू झाले असून ११ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. पर्यायी मार्गावर वाहतूक वळवण्यात आली असली तरी तेथेदेखील कोंडीचे विघ्न उभे राहिले आहे. ससूनवघर, ससुपाडा, बापाने, कामण, चिंचोटी, वाकीपाडा आणि जुचंद्र परिसरातील नागरिक शनिवारी पूर्णपणे हैराण झाले. रक्षाबंधनासाठी माहेरी जाणाऱ्या बहिणी अडकून पडल्या, अनेकांनी माघारी वळण्याचा निर्णय घेतला.दरम्यान, निवडणुकीपूर्वी 'लाडकी बहीण योजना' अंतर्गत महिना दीड हजार रुपये देण्याचे आश्वासन देणाऱ्या शासनाने निवडणुकीनंतर अनेक लाभार्थींना योजनाबाहेर ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूककोंडी आणि चुकीच्या नियोजनामुळे उद्भवलेल्या गोंधळाने संताप अधिकच वाढला आहे.'शासनाने ऐकले नाही, तर कंटेनर महामार्गावर आडवा घालू, आणि मग जबाबदार फक्त तुम्ही असाल,'असा इशाराच लाडक्या बहिणींनी दिला आहे.

## वसईत बस थांब्यांची दुरावस्था; गर्दुल्याचं अतिक्रमण

■ **वसई**

वसई विरार महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नागरिक महापालिकेच्या बससेवेचा वापर करतात. पण, गेल्या काही काळात महापालिकेने केलेल्या दुर्लक्षामुळे वसईतील बसथांब्यांची दुरावस्था झाली आहे. गर्दुल्याचं अतिक्रमण, तुटलेले नामफलक, तर काही ठिकाणी अक्षरशः बसथांबेच नसल्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. वसई विरार शहरात महापालिकेच्या परिवहन विभागाकडून बससेवा पुरवली जाते. दररोज हजारो प्रवासी या बसेसमधून प्रवास करतात. बसने प्रवास करण्यासाठी नागरिक बस थांब्यांवर गर्दी करतात. पण बसथांब्यांची दुरावस्था झाल्यामुळे अनेक प्रवशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. वसई पूर्व आणि पश्चिमेच्या बहुतांश भागातील बसथांब्यांवर छप्पर नसल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात नागरीकांची गैरसोय होते. तसेच अनेकदा गाड्या उशिरा येत असल्यामुळे नागरिकांना ताटकळत भर पावसात बसची वाट पाहत उभं राहावं लागतं.

## वसईत पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना पसंती

### शहरात पर्यावरण पूरक गणेशोत्सवाकडे वाढता कल

**प्रतिनिधी**
■ **विरार**

दिवसेंदिवस पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडे नागरिकांचा कल वाढत आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने नागरिक अधिक जागरूक झाले असून, पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणी वाढताना दिसत आहे. वसई विरार परिसरातही या मूर्तींना पंसती मिळत आहे.

वसईत दरवषी मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जातो. यातही घरगुती गणपतींची संख्या मोठी आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार केलेल्या मूर्ती या पर्यावरण पूरक नसल्याने विसर्जन केल्यानंतरही मुर्त्यांचे अवशेष तसेच राहतात. यासाठी अनेक जण आता पर्यावरणपूरक गणेश मूर्तीची स्थापना करतात. यात कागदाच्या लगद्यापासून, गोमय गणेश तसेच लाल मातीचा वापर करून साकारण्यात येणाऱ्या वृक्ष गणेश अशा पर्यावरण पूरक मूर्तींचा समावेश आहे. या मूर्ती बाराशे रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंत अशा किमतींमध्ये उपलब्ध असतात. विरार पश्चिमेच्या अथर्व आर्ट या गणेशशाळेत गेल्या सात वर्षांपासून केवळ पर्यावरणपूरक आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या जात आहेत.

## बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांची शोध मोहीम; पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील 12 बांगलादेशी हद्दपार

**प्रतिनिधी**
■ **वसई**



वाढत्या नागरिकरणाचा गैरफायदा घेत मिरा भाईंदर व वसई विरार शहरात बेकायदेशीर पणे परदेशी नागरिक वास्तव्यास येत असल्याच्या घटना समोर येत आहे. बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना आवर घालण्यासाठी १ ऑगस्ट पासून पोलीस आयुक्तालयाने शोध मोहीम सुरू केली आहे. यात आढळून आलेल्या १२ घुसखोर बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करत पोलिसांनी त्यांना हद्दपार केले आहे.

मागील काही वर्षांपासून मिरा भाईंदर व वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विशेषतः वसईच्या भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे उभी राहत असल्याने परिसर अतिशय दाटीवाटीचा बनला आहे. याचाच फायदा घेत परदेशी नागरिक छुप्या मार्गाने वास्तव्यास येऊ लागले आहेत. विशेषतः नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे. मागील काही महिन्यांपासून शहरात बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. विविध छुप्या मार्गांनी तसेच अवैध कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी घुसखोर शहरात वास्तव्य करत आहेत.

## वसईत राजकीय दहीहंड्यांचा रंगणार 'थरार'

### यंदाचा दहीकाला ठरणार राजकीय शक्तीप्रदर्शनाचा उत्सव

**प्रतिनिधी**
■ **वसई**




यंदाचा दहीकाला उत्सव हा राजकीय शक्तीप्रदर्शनाचा उत्सव ठरणार आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या सूचना राज्य शासनाला केल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी महापालिका निवडणूक घोषित होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर वसई -विरारमधील राजकीय पक्ष चार्ज झाले असून त्याची सुरुवात यंदाच्या दहीकाला उत्सवाने होणार आहे.

यंदा वसई- विरारमध्ये थरांचा थरार तर अनुभवायला मिळेलच, पण त्याहून जास्त राजकीय चढाओढीची स्पर्धा रंगणार आहे. गेल्या ३५ वर्षांपासून वसई- विरारमध्ये असलेली बहुजन विकास आघाडीची एक हाती सत्ता आणि या सत्तेला दंड थोपटून आव्हान देण्याचे काम भाजपाने केले आहे. त्यामुळे एका बाजूने बहुजन विकास आघाडी तर दुसऱ्या बाजूने हिंदू धर्माशी जास्त जवळीक असलेला पक्ष भाजप पक्षाकडून दहीहंडीचा थरार मोठ्या प्रमाणात अनुभवायला मिळणार आहे. तसेच लाखोंच्या बक्षिसांची उधळण होणार असून या वेळेला गोविंदा पथके मालामाल होणार आहेत.

वसई- विरार शहर महानगरपालिकेची निवडणूक या वेळेला अत्याधिक लक्षवेधी ठरणार आहे. बहुजन विकास आघाडी समोर भाजपाचे आव्हान असले तरी महाविकास आघाडीने देखील विधानसभा व लोकसभा मतदारसंघांमध्ये निर्णायक मते घेतलेली आहेत. त्यामुळे बहुजन विकास आघाडी व भाजप या प्रमुख पक्षांसोबतच महाविकास आघाडी देखील मोठ्या जोमाने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करून जास्तीत जास्त राजकीय शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे यंदाचा राजकीय दहीकाला कोण जिंकतो व कोण विजयाची हंडी फोडतो ते यंदाच्या दहीकाला उत्सवावरून प्रातिनिधिक स्वरूपात दिसून येणार आहे.

## पालघर जिल्ह्यात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा




**प्रतिनिधी**
■ **पालघर**

जागतिक आदिवासी दिन जिल्ह्याभरात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित रॅली आणि शोभायात्रेत आदिवासी बांधव, विशेषतः तरुण आणि महिला, हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. आदिवासी दिनाच्या निमित्ताने आज सकाळपासूनच जिल्ह्याच्या ग्रामीण भागासह विविध ठिकाणी आदिवासी बांधवांनी रॅलीचे आयोजन केले होते. पारंपरिक पोशाखात आणि काही ठिकाणी वेगवेगळ्या पुरस्कर्त्यांनी दिलेल्या टी-शर्टमध्ये आदिवासी तरुण-तरुणी या सोहळ्यात सहभागी झाल्याचे दिसून आले.

या रॅलींमध्ये पारंपारिक तारपा वाद्य वाजवून तारपा नृत्य तसेच इतर आदिवासी नृत्ये सादर करण्यात आली. अनेक तरुणांनी विविध वेशभूषा आणि रंगरंगोटी करून कार्यक्रमात उत्साह वाढवला. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आदिवासी समाजातील अनेक ज्येष्ठ मान्यवर या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पालघर शहरात भूमीसेना आणि आदिवासी एकता परिषदेने रॅलीचे आयोजन केले होते. याव्यतिरिक्त, गाव आणि तालुका पातळीवरही रॅली काढून आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून आदिवासी बांधवांनी या दिनाचा आनंद साजरा केला.

## वसई विरार महानगरपालिकेचा प्रभाग रचना प्रारूप आराखडा शासनाकडे सादर

**प्रतिनिधी**
■ **विरार**

मागील पाच वर्षांपासून रखडलेल्या वसई-विरार पालिकेच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. पालिकेने प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा शासनाला सादर केला असून, तो मंजुरीसाठी नगरविकास मंत्रालयाकडे आहे. यामुळे आता निवडणूक होणार, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार प्रभागरचना प्रारूप आराखडा तयार करण्याचे निर्देश निवडणूक आयोग आणि शासनाकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने प्रभागांची रचना कशा प्रकारे करण्यात यावी, यासंदर्भात परिपत्रक काढून जिल्हाधिकारी,




महापालिका आयुक्त आणि नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना कळविले होते. वसई विरार महापालिका क वर्गामध्ये मोडत असल्याने येथील प्रभागांची रचना महापालिका आयुक्तांकडून केली जात आहे.

निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार वसई-विरार पालिकेने आरक्षित प्रभागांची जाहीर सोडत यापूर्वी २१ मे २०२२ रोजी काढली होती. प्रभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध करून त्यावर १ जून ते ६ जून २०२२ या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या. त्यानंतर १३ मे २०२२ रोजी पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली. त्या वेळी सदस्य संख्या ११ने वाढवून १२६ करण्यात आली होती. आता मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ओबीसी जागांचा मुद्दा निवडणुकीसाठी निकाली निघाला आहे.

त्याचप्रमाणे चार सदस्यांचा एक प्रभाग अशाप्रकारे २०१७मध्ये प्रभागांची रचना करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रभागरचना प्रारूप आराखडा करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे वसई-विरार पालिकेच्या निवडणुकीसाठी २९ प्रभागांची रचना करण्यात आली असून, प्रारूप आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला आहे. २८ प्रभागांत चार नगरसेवक तर २९व्या प्रभागात तीन अशाप्रकारे २९ प्रभागांत ११५ नगरसेवकांसाठी वसई-विरार महापालिकेची निवडणूक होणार आहे. महापालिकेकडून पाठविण्यात आलेल्या प्रभागरचना प्रारूप आराखड्याला २१ ऑगस्टपर्यंत निवडणूक आयोगाकडून मान्यता घ्यावी लागणार आहे.

## उपनियंत्रक,नागरी संरक्षण दल,जिल्हा पालघर कार्यालयामार्फत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन




■ **बोईसर**

महाराष्ट्र शासन गृह विभाग विशेष उपनियंत्रक नागरी संरक्षण दल (सिव्हिल डिफेन्स), कार्यालय जिल्हा पालघर या कार्यालयामार्फत चिराग विद्यालय,भीमनगर बोईसर येथे दिनांक ०४/०८/२०२५ ते ०८/०८/२०२५ या पाच दिनसांच्या कालावधीत मूलभूत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन पालघर जिल्ह्याचे उपनियंत्रक मा.काशिनाथ आर.कुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बोईसर विधानसभा क्षेत्रे विभागीय क्षेत्ररक्षक श्री.नरेश अनंत म्हस्के यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण घेण्यासाठी पंचक्रोशीतील महिला/पुरुष यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. आणीबाणीच्या काळात शत्रूच्या हल्ल्यापासून प्रत्येक व्यक्ती,मालमत्ता व संस्था यांचे संरक्षण करण्यासाठी नागरी संरक्षण कायदा,१९६८ नुसार नागरी संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे,नागरी संरक्षण संघटनेची उभारणी समाजातील विविध स्तरातील लोकांना नागरी संरक्षणविषयक प्रशिक्षण देऊन स्वयंसेवक म्हणून भरती करून करण्यात येते. कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी जसे पूर,भूकंप,दहशतवादी हल्ला,आग स्फ़ोट इत्यादी वेळी नागरी संरक्षण संघटनेचे प्रशिक्षित कर्मचारी व स्वयंसेवक महत्वाच्या इतर शासकीय संस्था पोहोचण्यापूर्वी दुर्घटना स्थळी लोकांना मदत व बचावाचे कार्य करते.दुर्घटनेनंतर पहिले काही क्षणच सुटका व बचाव कार्याच्या दृष्टीने महत्वाचे असतात.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 51
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ५१
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

**मुंबई ।** आराध्या ग्रुप आयोजक विजय तांडेल यांच्या वतीने वडाळा येथे दहीहंडी सराव शिबिराचे आयोजन केले होते. त्यास विभागातील गोविंदा पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये माजी नगरसेविका सानवी तांडेल, माजी नगरसेवक अमेय घोले, सुनील घाटे आणि इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.



# निवडणूक आयोगाने मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक व्यवस्था उद्‌ध्वस्त केलीय!

## आदित्य ठाकरे यांची टीका



प्रतिनिधी
■ मुंबई

निवडणूक आयोगाकडून विरोधी पक्षांच्या नेत्यांना धमकावण्याचा प्रकार लज्जास्पद आहे अशी टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, आमदार आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली. तसेच निवडणूक आयोगाने देशातली मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक उद्ध्वस्त केली असेही आदित्य ठाकरे म्हणाले. माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, संपूर्ण जग पाहत आहे की निवडणूक आयोगाने भारतातील मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक उद्ध्वस्त केली आहे.

मीडियाशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, संपूर्ण जग पाहत आहे की निवडणूक आयोगाने भारतातील मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका कशा उद्ध्वस्त केल्या आहेत. विरोधी पक्षांच्या नेत्यांना धमकावण्याचा आयोगाचा प्रकार लज्जास्पद आहे. निवडणूक आयोगाने स्पष्टपणे भूमिका मांडून राहुल गांधींच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. निवडणूक आयोग स्वतःला सर्वोच्च न्यायालयापेक्षा वरचं मानत आहे. सर्वोच्च न्यायालयातसुद्धा त्यांनी असे म्हटले आहे की, बिहारमधून ज्या व्यक्तींची नावे वगळण्यात आली आहेत, त्यांची यादी ते सादर करणार नाहीत. मग त्यांना मतदानाचा हक्क नाही काय? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

कर्नाटकच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपांबाबत पुरावे द्या ,अशी नोटीस पाठवली होती.निवडणूक आयोगावर राहुल यांनी आरोप केलेत ती कागदपत्रे सादर करा असे त्यांना नोटिशीत बजावण्यात आले आहे. कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपांबाबत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना नोटीस बजावली आहे.

नोटीसमध्ये राहुल गांधी यांना निवडणूक आयोगावर ज्या कागदपत्रांच्या आधारे आरोप केले होते ते कागदपत्रे देण्यास सांगितले आहे.कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे की, राहुल गांधी यांनी त्यांच्या पत्रकार परिषदेदरम्यान दावा केला होता की, हा डेटा निवडणूक आयोगाचा आहे आणि मतदान अधिकाऱ्यांच्या नोंदींमध्ये शकुन राणी नावाच्या महिलेचे नाव दोनदा नोंदवले गेले आहे. या कार्यालयाने केलेल्या प्राथमिक तपासणीत असे दिसून आले आहे की, तुम्ही दाखवलेला, टिक केलेला कागदपत्र हा मतदान अधिकाऱ्याने जारी केलेला कागदपत्र नाही. म्हणून तुम्हाला विनंती आहे की, ज्या आधारावर तुम्ही असा निष्कर्ष काढला आहे की, शकुन राणी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने दोनदा मतदान केले आहे, ते कागदपत्रे आम्हाला द्यावेत. जेणेकरून या कार्यालयाकडून सविस्तर चौकशी करता येईल. या नोटिसीवर नाराजी व्यक्त करताना युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे म्हणाले,विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांबाबत निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण करण्याऐवजी राहुल यांनाच नोटीस पाठवणे योग्य नाही. राहुल यांनी केलेल्या मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपांची आयोगाने कसून चौकशी करावी असेही आदित्य शेवटी म्हणाले.

# आणखी 8 झोपु प्रकल्प म्हाडा राबवणार रखडलेले प्रकल्प झोपु प्राधिकरण ताब्यात घेणार

प्रतिनिधी
■ मुंबई

रखडलेले 17 झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) राबवण्याचा निर्णय झालेला असताना आता आणखी 8 प्रकल्प म्हाडाकडे देण्यात येणार आहेत. हे प्रकल्प रखडल्यामुळे संबंधित विकासकांकडून ते काढून घेतले जात आहेत.

मुंबईतील रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प इतर प्राधिकरणांमार्फत पूर्ण करण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर म्हाडाच्या भूखंडांवरील 24 झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प म्हाडाला देण्यात आले. त्यापैकी काही प्रकल्प व्यवहार्य ठरत नसल्याने केवळ 17 प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला. यापैकी कुर्ला, चेंबूर आणि जोगेश्वरी येथील एकूण 3 प्रकल्पांसाठी झोपु प्राधिकरणाने म्हाडाला हेतूपत्र दिले आहे.हेतूपत्र दिलेल्या 3 प्रकल्पांमध्ये एकूण 600 झोपड्या आहेत. या प्रकल्पांच्या मंजुरीसाठी म्हाडाने गृहनिर्माण विभागाने प्रस्ताव पाठवले आहेत. म्हाडाला नव्याने देण्यात येणाऱ्या 8 प्रकल्पांत साधारण 22 हजार झोपड्या आहेत. हे प्रकल्प झोपु प्राधिकरणाने आपल्या ताब्यात घेतले आहेत. या सर्व प्रकल्पांमध्ये झोपु प्राधिकरण नियोजन प्राधिकरण असल्याने प्रकल्प राबवण्यापूर्वी त्याचा आराखडा झोपु प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठवला जाईल.

पान 1 वरून..

**राहुल गांधी आक्रमक**

आणि ती भाजपच्या फायद्यासाठी रचली गेली होती. काँग्रेसच्या अंतर्गत विश्लेषणानुसार, कर्नाटकमध्ये 16 जागा जिंकण्याचा अंदाज होता, मात्र प्रत्यक्षात केवळ 9 जागा काँग्रेसने जिंकल्या. विशेषतः महादेवपूरा मतदारसंघामध्ये 1,00,250 मतदारांची डुप्लिकेट नोंद, बनावट पत्ते व एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नोंदणी अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात अपप्रवृत्ती आढळल्या, असा दावा राहुल गांधींनी प्रेस कॉन्फरन्समध्ये सादरीकरण करून केला होता. निवडणूक आयोगाने मात्र राहुल गांधींना आव्हान दिलं आहे की, जर त्यांच्या आरोपांमध्ये तथ्य असेल तर 1960 च्या मतदार नोंदणी नियमांनुसार स्वाक्षरी असलेलं शपथपत्र सादर करावे. अन्यथा त्यांनी देशाची माफी मागावी, असं आयोगाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**गरज पडली तर शस्त्र उचलू !**

आणि पोलीस प्रशासन आमच्या पक्षांना मरू देत असेल, तर आम्ही सहन करणार नाही," असंही जैन मुनी निलेशचंद्र यांनी म्हटलं आहे.
भाजपानं जैन समाजाला हिंसक बनवलं - संजय राऊत : "जैन समाज हा परंपरेनं अहिंसक आणि संयमी मानला जातो. पण, हातात शस्त्र घेऊन ते हिंसक होत असतील, तर ते त्यांच्या धर्माचा विचार पाळत नाहीत. या समाजाला हिंसक बनवण्याचं काम भाजपा आणि नरेंद्र मोदी करीत आहेत. त्यामुळं हा समाज त्यांच्या मूळ विचारांपासून दूर होत चालल्याचं दिसत आहे," अशी प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिली.
"कबुतरखान्याचा प्रश्न सामाजिक आहे की धार्मिक आहे? इगो हर्ट झाल्यासारखं ते वागत आहेत. त्यांना नेमकं काय सिद्ध करायचं आहे? त्यांच्या समाजातील नेत्यांनी समोर यावं आणि यावर तोडगा काढावा. एवढं तुमचं कबुतरांवर प्रेम आहे, तर जैन मंदिरात जाळ्या का लावल्या? कबुतरांची वाढ झपाट्यानं होत आहे. यावर काहीतरी अंकुश आणला पाहिजे. जैन समाजाच्या आंदोलनावेळी काही महिला चाकू घेऊन आल्या होत्या.
त्यांना तिकडं बोलावण्यात आलं होतं, हे सगळं व्हिडिओत स्पष्टपणं दिसतंय. तुमचं कबुतरांवर प्रेम आहे, तर तुम्ही घरी पिंजरामध्ये दोन-चार कबुतरं ठेवा. तुम्हाला सार्वजनिक जागेत वाद का निर्माण करायचा आहे?, " असा सवाल शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी उपस्थित केला.

**युद्ध लवकरच होऊ शकतं!**

खेळत होतो आणि तो (शत्रू) देखील बुद्धिबळ खेळत होता. आम्ही त्यांना चेकमेट करत होतो, जीव धोक्यात घालून शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान करण्याचा प्रयत्न करत होतो. हेच तर जीवन आहे. जनरल द्विवेदी म्हणाले की याला ग्रे झोन म्हणतात. याचा अर्थ असा की आपण पारंपरिक ऑपरेशन्स करत नाही आहोत. शनिवारी आयआयटी मद्रास येथे 'अग्निशोध' - इंडियन आर्मी रिसर्च सेल (IARC) च्या उद्घाटनादरम्यान त्यांनी हे सांगितले.त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर - दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईतील एक नवीन अध्याय' या विषयावर देखील भाषण दिले. त्यांनी ऑपरेशन सिंदूर हे एक सुनियोजित, गुप्तचर-आधारित ऑपरेशन असल्याचे वर्णन केले जे सैद्धांतिक बदलाचे प्रतिबिंबित करते.

**मराठा नेत्यांना फडणवीस संपवतायत...**

नेत्यांना त्रास दिला जात आह . असेही जरांगे पाईल यांनी म्हटले आहे. “ आमची परिस्थती बिकट आहे ” असे सांगणारे नेते दररोज संपर्क साधत आहेत, असा दावा जरांगे पाटील यांनी केला आहे. मराठा आरक्षणसाठी लढा तीव्र करणार असल्याची भुमिका मनोज जरांगे पाटलांनी मांडली. मराठ्यांना ओबीसी मधूनच आरक्षण पाहिजे, त्याच्याशिवाय दुसरं आरक्षण आम्ही घेणार नाही. 29 ऑगस्टला चलो मुंबईच्या निर्णयावर आम्ही ठाम असल्याचेही जरांगे पाटील म्हणाले.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत “कार्यालयीन खर्च” या लेखाशिर्षकाअंतर्गत ठामपा शाळा क्र.१९ इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणे व इतर आवश्यक स्थापत्य कामे करणे या ०१ कामांकरीता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या निविदाकारांवर शासकीय/निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई-मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/ काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे. अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि.११/०८/२०२५ ते दि.१८/०८/२०२५ ते पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.१८/०८/२०२५ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.२०/०८/२०२५ रोजी स.११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा-नौ- को. प्र.स/५०१/२०२५-२६ **सही/-**
दि.०७.०८.२०२५
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे
**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**गट - ‘क’ व गट - ‘ड’ मधील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात**

ठाणे महानगरपालिका आस्थापनेवरील गट-‘क’ व गट-‘ड’ मधील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदे हि प्रशासकीय सेवा,लेखा सेवा, तांत्रिक सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा, निमवैद्यकीय सेवा, इत्यादी सेवेमधील आहेत. भरती प्रक्रियेत तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, जाहिरातीनुसार गट-‘क’ व गट-‘ड’ मधील एकूण १७७३ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दि.१२/०८/२०२५ ते दि.०२/०९/२०२५ पर्यंत आहे. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छूक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.०२/०९/२०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत. विविध संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवा/संवर्ग | पदनाम | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | | भरावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनस्तर | वेतनश्रेणी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रशासकीय सेवा (गट - क) | सहायक परवाना निरीक्षक | एस-१० | २९२००-९२३०० | ०२ |
| २ | प्रशासकीय सेवा (गट - क) | लिपीक तथा टंकलेखक | एस-६ | १९९००-६३२०० | ५३ |
| ३ | लेखा सेवा (गट - क) | लिपीक लेखा | एस-६ | १९९००-६३२०० | ३२ |
| ४ | तांत्रिक सेवा (गट - क) | कनिष्ठ अभियंता - १ (नागरी) | एस-१५ | ४१८००-१३२३०० | २४ |
| ५ | तांत्रिक सेवा (गट - क) | कनिष्ठ अभियंता - १ (यांत्रिकी / ऑटो) | एस-१५ | ४१८००-१३२३०० | १६ |
| ६ | तांत्रिक सेवा (गट - क) | कनिष्ठ अभियंता - १ (विद्युत) | एस-१५ | ४१८००-१३२३०० | ०४ |
| ७ | तांत्रिक सेवा (गट - क) | कनिष्ठ अभियंता - २ | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ६३ |
| ८ | तांत्रिक सेवा (गट - क) | प्रदूषण निरीक्षक | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ९ | अग्निशमन सेवा (गट - क) | सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी | एस-१० | २९२००-९२३०० | १३ |
| १० | अग्निशमन सेवा (गट - क) | चालक-यंत्रचालक | एस-७ | २१७००-६९१०० | २०७ |
| ११ | अग्निशमन सेवा (गट - क) | फायरमन | एस-५ | १८०००-५६९०० | ३८१ |
| १२ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | वाचा उपचार तज्ञ (जिद्द शाळा) | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| १३ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | मानसोपचार तज्ञ (जिद्द शाळा) | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| १४ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | परिचारिका (जिद्द शाळा) | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०३ |
| १५ | शिक्षण सेवा (गट - क) | विशेष शिक्षक (अस्थिव्यंग) | एस-१० | २९२००-९२३०० | ०५ |
| १६ | सार्वजनिक आरोग्य सेवा (गट - क) | स्वच्छता निरीक्षक | एस-८ | २५५००-८११०० | ०५ |
| १७ | वैद्यकीय सेवा (गट - क) | डायटिशियन | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०२ |
| १८ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | बायोमेडिकल इंजिनिअर | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०३ |
| १९ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | फिजिओथेरपिस्ट | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०२ |
| २० | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | सायकॅट्रीक कौन्सिलर | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०३ |
| २१ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | पब्लिक हेल्थ नर्स (पी.एच.एन.) | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०४ |
| २२ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | वैद्यकीय समाजसेवक | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०६ |
| २३ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | क्ष-किरण तंत्रज्ञ | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०८ |
| २४ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | नर्स मिडवाईफ / परिचारीका / स्टाफ नर्स | एस-१३ | ३५४००-११२४०० | ४५७ |
| २५ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | मेमोग्राफी टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०२ |
| २६ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | एन्डोस्कोपी टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०२ |
| २७ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ऑडीओमेट्री टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| २८ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | क्लिनिकल सायकोलॉजिस्ट | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०२ |
| २९ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | सी.टी. स्कॅन तंत्रज्ञ एम. एन. तंत्रज्ञ | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ३० | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | अल्ट्रा सोनोग्राफी / सी.टी.स्कॅन तंत्रज्ञ | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०२ |
| ३१ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ई.सी.जी. टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | १९ |
| ३२ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ब्लड बँक टेक्निकल सुपरवायझर | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०४ |
| ३३ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ब्लड बँक टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | १० |
| ३४ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | स्पिच थेरेपिस्ट | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०२ |
| ३५ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | चाईल्ड सायकोलॉजिस्ट | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ३६ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | प्रोस्टेटिक व ऑर्थोटिक टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ३७ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ई.ई.जी.टेक्निशियन | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ३८ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | मेडिकल रेकॉर्ड ऑफिसर | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ३९ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | फिजिसिस्ट | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०१ |
| ४० | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | क्युरेटर ऑफ म्युझियम | एस-१३ | ३५४००-११२४०० | ०३ |
| ४१ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | औषध निर्माण अधिकारी | एस-१० | २९२००-९२३०० | ३६ |
| ४२ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ऑक्यूपेशनल थेरपिस्ट | एस-१० | २९२००-९२३०० | ०२ |
| ४३ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | पलमोनरी लॅब टेक्निशियन | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४४ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ऑपथॅलमिक असिस्टंट | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४५ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | डेप्युटी लायब्रेरियन | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४६ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | लायब्ररी असिस्टंट | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४७ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | आर्टिस्ट | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४८ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | सहायक ग्रंथपाल | एस-१० | २९२००-९२३०० | ०१ |
| ४९ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | सहायक क्ष-किरण तंत्रज्ञ | एस-८ | २५५००-८११०० | ०८ |
| ५० | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | मल्टी पर्पज वर्कर (बहुउद्देशिय कामगार) | एस-८ | २५५००-८११०० | ३३ |
| ५१ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | स्टॅटिस्टीशियन | एस-८ | २५५००-८११०० | ०१ |
| ५२ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ऑडिओ व्हिज्युअल टेक्निशियन | एस- ८ | २५५००-८११०० | ०२ |
| ५३ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | सहायक प्रयोगशाळा तंत्रज्ञ | एस-७ | २१७००-६९१०० | ०३ |
| ५४ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | मेडिकल रेकॉर्ड किपर | एस-६ | १९९००-६३२०० | ०३ |
| ५५ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | प्रसाविका | एस-६ | १९९००-६३२०० | ११७ |
| ५६ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | ज्युनियर टेक्निशियन | एस-६ | १९९००-६३२०० | ६० |
| ५७ | निमवैद्यकीय सेवा (गट - क) | लेप्रसी असिस्टंट | एस-५ | १८०००-५६९०० | ०१ |
| ५८ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | शस्त्रक्रिया सहायक | एस-५ | १८०००-५६९०० | २५ |
| ५९ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | वॉर्डबॉय | एस-१ | १५०००-४७६०० | ३७ |
| ६० | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | दवाखाना आया | एस -१ | १५०००-४७६०० | ४८ |
| ६१ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | लॅबोरेटरी अटेंडन्ट | एस-१ | १५०००-४७६०० | ०२ |
| ६२ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | पोस्ट मॉर्टम अटेंडन्ट | एस-१ | १५०००-४७६०० | ०४ |
| ६३ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | मॉरच्युरी अटेंडन्ट | एस-१ | १५०००-४७६०० | ०६ |
| ६४ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | अटेंडन्ट | एस-१ | १५०००-४७६०० | २८ |
| ६५ | निमवैद्यकीय सेवा (गट - ड) | न्हावी (बार्बर) | एस-१ | १५०००-४७६०० | ०२ |
| | | एकूण | | | १७७३ |

- **टिप** :- (अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेले लिपीक तथा टंकलेखक - ०७ पदे, अग्निशामक (फायरमन) — ०२ पदे, चालक - यंत्रचालक -०१ पद, व वॉर्डबॉय - ०२ पदे या प्रमाणे एकूण १२ पदे अनुसूचित जमाती प्रवर्गात भरण्याकरीता एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.)

**ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १) | अर्ज सादर करावयाचा कालावधी. | दिनांक १२ ऑगस्ट,२०२५ रोजी १४:०० ते दिनांक ०२ सप्टेंबर,२०२५ रोजी २३:५९ |
| २) | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक. | दिनांक ०२ सप्टेंबर,२०२५ रोजी २३:५९ |
| ३) | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ०७ दिवस अगोदर. |
| ४) | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रात नमूद केल्यानुसार) | ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |
| ५) | तांत्रिक समस्या उद्भवल्यास हेल्पलाईन नंबर | ०२२-६१०८७५२० |
| ६) | जाहिरातीमधील बाबीसंबंधी विचारणा करण्यासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी | ०२२- २५४१५४९९<br>वेळ :कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सोमवार ते शुक्रवार १०:३० ते १७:३०.<br>tmcrecruitment2025@gmail.com |

- परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र इत्यादी बाबी प्रवेशपत्रामध्ये नमूद केल्या जातील. संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येईल.
- **परीक्षा शुल्क:-**

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| अमागास प्रवर्ग | मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग |
| रु.१,०००/- | रु.९००/- |

१ माजी सैनिक व दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी शुल्क माफ राहील.
२ अर्ज व परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणे आवश्यक आहे.
३ उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.
४ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) आहे. ऑनलाईन शुल्क भरतांना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास परीक्षा शुल्क परत करण्यात येणार नाही.
५ ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत / तपशिल तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा/वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/आस्था/ ५०६/२०२५-२६
दि.१०.०८.२०२५
Please visit our official website
www.thanecity.gov.in

सही/-
(सौरभ राव भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
ठाणे महानगरपालिका, ठाणे

अंधारामुळे प्रकाशाचे, दुर्गंधामुळे सुगंधाचे आणि वेड्यामुळे शहाण्याचे महत्त्व कळते !



- डॉ. जयंत आठवले

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, ११ ऑगस्ट २०२५

# महामार्गांचा महाविकास

एखादा रस्ता अथवा महामार्ग हा विकास आणि प्रगतीसाठी तसेच दळणवळणसाठी खूपच महत्त्वाचा ठरतो यांचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गाकडे पाहिले पाहिजे. दरवर्षी या मार्गावर वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात भर पडत असल्याने आणखी एका महामार्गची आवश्यकता निर्माण झाली आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. मुंबई-पुणे प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होण्याची शक्यता आहे. अशावेळी संभाव्य वाढत्या वाहनसंख्येला सामावून घेण्यासाठी एनएचएआयने तिसरा महामार्ग प्रस्तावीत केला असल्याने भविष्यात त्याचा किती फायदा होणार याची कल्पना येईल. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा भारतातील सहा लेन असलेला पहिला महामार्ग आहे, ज्याला यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग या नावानेही ओळखले जाते आणि मुंबई आणि पुणे दरम्यानच्या एकूण अंतरापैकी ९४.५ किमी अंतर या महामार्गावर आहे. जुना मुंबई-पुणे महामार्ग, अधिकृतपणे राष्ट्रीय महामार्ग ४८ म्हणून ओळखला जातो, हा मुंबई आणि पुणे यांना जोडणारा पारंपारिक मार्ग आहे. सुमारे १५० किलोमीटर पसरलेला, हा रस्ता अशा प्रवाशांसाठी आवडला आहे जे अधिक आरामदायी प्रवास करू शकतात. तर वेळेची बचत होणारा मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्ग आहे. असे असले तरी या मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गावर अनेकदा वाहतूक कोंडी होताना दिसते. याशिवाय, घाट परिसरात अनेकदा वाहनांच्या रांगा लागून प्रवासी तासन्तास अडकून बसतात. एक्स्प्रेस वे लगत वाढलेले नागरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे या महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या वाढत चालली आहे. यासाठी लोणावळा परिसरात मिसिंग लेन तयार केली जात आहे. मुंबई-पुणे प्रवासाचा कालावधी कमी करणाऱ्या या मिसिंग लेनचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र, भविष्यात ही सुविधाही अपुरी पडण्याची शक्यता आहे. एनएचएआयकडून पुणे-बंगळूरु असा ७०० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्यात येत आहे. आठ मार्गिकेच्या आणि अंदाजे ४२ हजार कोटींचा हा महामार्ग कर्नाटक आणि महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यातून जात असल्याचे सांगण्यात येते. वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि तिसऱ्या मुंबईच्या विकासामुळे भविष्यात मुंबई-पुणे मार्गावरील वाहनांची संख्या लक्षणीय वाढणार आहे. यामुळे विद्यमान द्रुतगती महामार्गावरचा ताण कमी करण्यासाठी आणि वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हा तिसरा महामार्ग बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा मार्ग प्रवासाचा वेळ कमी करेल आणि आर्थिक व औद्योगिक विकासाला चालना देईल अशी आशा आहे. हा तिसरा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग अटल सेतूपासून सुरू होईल आणि पुणे वर्तुळाकार रस्त्याला जोडून पुढे पुणे-बंगळूरु महामार्गाला मिळेल. या नवीन मार्गिका लांबी सुमारे १३० किलोमीटर असेल. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या महामार्गामुळे मुंबई ते पुणे हे अंतर केवळ दीड तासात पार करता येणार असल्याचे सांगण्यात येते. या पार्श्वभूमीवर अटल सेतू शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने सोलापूर आणि साताऱ्याला जोडण्यात आल्यास मोठा फायदा होऊ शकतो. नव्या प्रस्तावित महामार्गाद्वारे अटल सेतू आणि जेएनपीटी थेट पुणे, सातारा, सोलापूरला जोडले जाईल. तब्बल १३० किलोमीटर लांबीचा हा शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग चौक-पुणे-असा असेल. या मार्गावर वेगवान प्रवासासाठी एकूण ८ लेन सध्या तरी अपेक्षित आहेत. या रस्त्याच्या बांधकामासाठी तब्बल १७हजार कोटी रुपयांचा खर्च असला तरी त्यात वाढ होऊ शकते. या तिसऱ्या महामार्गासोबतच, सध्याच्या मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागातील मिसिंग लिंक प्रकल्पही लवकरच पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत सुरू असलेल्या खोपोली एक्झिट ते कुसगाव या सुमारे १४ किलोमीटरच्या पर्यायी रस्त्याचे ९४ टक्के काम पूर्ण झाले असून तो ऑक्टोबर २०२५ पर्यंत प्रवाशांसाठी खुला होण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पात डोंगराळ भागात १३५ मीटर उंचीचा केबल पूल बांधण्यात आला आहे. देशात नवीन महामार्ग आणि द्रुतगती मार्ग अतिशय वेगाने बांधले जात आहेत. देशाच्या स्वातंत्र्यानंतर, भारतात अनेक मोठे एक्सप्रेसवे बांधले गेले आहेत, जे जवळजवळ सर्व मोठ्या शहरांना जोडतात. यामध्ये नागपूर-गोवा शक्तीपीठ एक्सप्रेसवे, नागपूर-गोंदिया एक्सप्रेसवे, नागपूर-चंद्रपूर एक्सप्रेसवे आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेच्या विस्तारासह महाराष्ट्रात आठ नवीन महामार्ग सुरू करण्यात येणार आहेत. या महामार्गामुळे राज्यातील रस्ते पायाभूत सुविधांमध्ये मोठी वाढ होणार असल्याचा दावा केला जातो. या नव्या महामार्गांमुळे महाराष्ट्र वाहतूक केंद्र म्हणून विकसित होईल. यामुळे प्रमुख शहरे, धार्मिक स्थळे आणि आर्थिक केंद्रांमधील संपर्क वाढेल. हे महामार्ग प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करतील, पर्यटनाला चालना देतील आणि व्यापारी वाहतूक मार्ग सुधारतील. त्यामुळे राज्याच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती होण्याची शक्यता आहे. पण असे असले तरी हा मार्ग खर्चिक आहे ही बाबसुद्धा महत्वाची आहे. मुंबई पुणे एक्स्प्रेस वे हा देशातील सर्वात महागडा एक्स्प्रेस वे मानला जातो. या एक्स्प्रेस वेवरील टोल टॅक्स दरवर्षी ६% ने वाढवला जातो, परंतु दर तीन वर्षांनी तो १८% ने वाढवला जातो. ती शेवटची दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०२३ मध्ये वाढवण्यात आली होती. नवीन तिसरा महामार्ग तयार झाला तरी त्यावर किती टोल आकारनी होणार हा कळीचा मुद्दा आहेच. सध्याचा महामार्ग असला तरी तो अनेकांना तापदायक ठरत आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवर दिवसेंदिवस वाहनांची गर्दी वाढत जातेय. हे चित्र कायम दिसते. त्यामुळे लोकांना तासन्तास वाहतूक कोंडीत उभं राहावं लागतं. अंदाजे ३ ते साडेतीन तासांच्या या प्रवासाला वाहतूक कोंडीमुळे कधीकधी ६ तास लागतात. मुंबई आणि पुणे या दोन शहरांना जोडणारा एकमेव रस्ता म्हणजे मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग. कोकण आणि उत्तर महाराष्ट्र वगळता पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याचा बराचसा भाग हा मुंबई गाठण्यासाठी याच महामार्गाचा उपयोग करतो. मात्र, गेली अनेक वर्ष या रस्त्याची चर्चा होतेय ती फक्त वाहतूक कोंडीमुळेच. वाहनांच्या लांबच लांब रांगा, तासंतास अडकलेले वाहन आणि गुदमरलेले प्रवासी असंच या महामार्गाचं चित्र कायम असतं. सध्या या एक्सप्रेस वेवर लोणावळा खंडाळ्याजवळ मोठं घाट क्षेत्र आहे. तिथे कायम वाहतूक कोंडी होत असून, वाहनांना वळसा घालत पुढे जावं लागतं. सध्याच्या एक्सप्रेसवेवरचा खोपोली एक्झिट ते सिंहगड इन्स्टिट्यूटपर्यंतचा भाग' १९ किमी लांब आहे. हा संपूर्ण घाट आणि चढ उतार टाळून थेट बाजूने दुसरा रस्ता तयार करण्यात आला आहे. या रस्त्यामध्ये दोन मोठे बोगदे आणि पूल आहे. त्यामुळे या मिसिंग लिंकच्या बांधकामानंतर हे १९ किमीचं ते अंतर १३ किमी होईल. त्यामुळे, मुंबई ते पुणे एक्सप्रेस वेची एकूण लांबी ६ किमीने कमी होईल असा अंदाज आहे. एकूणच विकास आणि प्रगतीच्या वाटेवर लोकांचा प्रवास भविष्यात सुसह्य व सुसाट होईल अशी अपेक्षा आहे. याबरोबर घोडबंदर रोडचा वाहतूक कोंडीला सुद्धा कायमचा पायबंद बसेल अशी व्यवस्था उपलब्ध होईल अशी आशा आहे.

# कामगार नेते व सफाई कामगार वाद मिटवा



## महापालिकायन

सुनील शिंदे

मोबाईल नंबर–९८२१९९६११७

**भारतातील** कामगार चळवळीचा इतिहास मोठा आहे. ब्रिटिश राजवटीत कामगारांवरील अन्याय दूर करण्यासाठी कामगार नेत्यांनी संप वगैरे केले. ब्रिटिशांनी ते संप बेकायदेशीर ठरवून नेत्यांना तुरुंगात धाडले. कामगारांच्या न्याय हक्कासाठी विविध संघटनांचे नेते एकत्र येऊन लढा देत राहिले. मुंबईची कामगार चळवळ ही नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरू केली. त्यावेळी कामगार चळवळीत

ना.म. जोशी, डांगे, मिरजकर, परुळेकर, रणदिवे यांच्या पासून ते डॉ.एन.डी. पाटील, दत्ता सामंत, र. ग. कर्णिक यांच्यापासून ते शरद राव यांनी कामगार चळवळीचं नेतृत्व केले. तर कॉ.ए.एस.डांगे, एस.एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अगर शेख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नेत्यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये कामगारांच्या न्याय हक्कांसाठी आवाज उठवला. कामगार नेत्यांनी कामगारांचे प्रश्न अत्यंत गांभिर्याने घेतले व ते सोडविण्यासाठी सनदशीर मार्गांचा वापर केला त्यामुळे कामगार चळवळीने एक वेगळी ऊंची गाठली होती. स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानिक व कायद्याचे संरक्षण कामगारांना मिळवून दिले. हे कामगार चळवळीचे यश होते. पण कामगारांना स्वाभिमानाने ताठ उभे करणारे, आपल्याला मिळालेल्या कामगार कायद्याची अंमलबजावणी झाली नाही तर संबंधितांना जाब विचारण्याची हिंमत कामगारांमध्ये होती.पण आज चित्र बदललेले दिसत आहे. २०१४ पासून केंद्रात असलेल्या भाजप प्रणित सरकारने कामगारांना देशोधडीला लावण्याचा चंग बांधला आहे. कामगारांच्या भल्याचा विचार करून तयार करण्यात आलेले कायदे या सरकारने गुंडाळून ठेवले. त्या विरुद्ध कामगार संघटनांनी दिल्लीसह देशभरात आंदोलने केली. पण उलट या आंदोलकांचा छळ करण्यात सरकारने धन्यता मानली. कंत्राटी पद्धतीने कामगार भरती करण्याचे मनसुबे त्यांनी रचले. आणि सर्वत्र त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे आता या कंत्राटी कामगारांना कोणतेही आर्थिक वा सामाजिक लाभ मिळत नाहीत. नोकरीची शाश्वती त्याला राहिलेली नाही.जो पर्यंत मालकाच्या मर्जीत तो चांगला आहे तो पर्यंत तो तिथे कंत्राटी कामगार म्हणून टिकू शकेल. एकदा का मालकाच्या मर्जीतून तो कामगार.उतरला की, त्याला तत्काळ नोटीसविना काढून टाकण्याचा अधिकार मालकाला मिळालेला आहे. ब्रिटिश राजवटीत कामगारांवर, कष्टकऱ्यांवर जसा नोकरीत अन्याय होत होता. तीच परिस्थिती आता स्वातंत्र्यानंतर पुन्हा निर्माण होऊ घातली आहे.

२० व्या शकतील कामगार चळवळीने कामगार हित समोर ठेऊन कामगार कल्याण करण्याचा प्रयत्न केला. मात्र कामगार चळवळीच्या वाटचालीचा आढावा घेतल्यावर २१ व्या शतकातील कामगार चळवळी समोर मोठी आव्हाने दिसून येतात. एका बाजूला ज्यांच्यावरती आजही खूप अन्याय होत आहे अशा असंघटित कामगारांची संख्या प्रचंड आहे आणि त्यांना संघटनेची गरजही प्रचंड आहे पण त्याच वेळी या असंघटित समाजाला आपल्यात सामावून घेण्यात संघटित कामगार चळवळ अयशस्वी ठरली आहे. त्यामुळे कामगार संघटनांचे अस्तित्वही आज धोक्यात आले आहे. या परिस्थितीवर मात करून, कात टाकून पुन्हा एकदा कामगार चळवळीला ताठ कण्याने उभे राहायचे असेल तर त्यासाठी तिला कठोर आत्मचिंतन करावे लागेल आणि त्यानंतर कुठल्यातरी एखाद्या व्यापक ध्येयाची कास तिला धरावी लागेल, एखादे व्यापक ध्येय समोर असेल; तर माणूस मरगळ झटकून पुन्हा उभा राहू शकतो, जोमाने वाटचाल सुरू करू शकतो. श्रमिकांना स्वातंत्र्याच्या प्रवाहात आणण्यासाठी भारतीय कामगार चळवळीने फार मोठे कार्य केलेले आहे. काळाचे आव्हान कामगार चळवळीने स्वीकारले पाहिजे. कामगाराच्या समस्या संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच सुटू शकतात. औद्योगिकीकरण हे रोजगारक्षम असले पाहिजे. ते रोजगारनिमिर्तीला बाधक बनता कामा नये. नव्या आधिकं धोरणाबरोबरच उत्पादनक्षमतेसाठी आवश्यक म्हणून कामगारविषयक कायद्यातील जाचक अटी दूर व्हायला पाहिजेत. भांडवलदारी उत्पादनपद्धतीने व मुक्त बाजारव्यवस्थेने सामान्य जनतेचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच तीव्र होत चाललेले आहेत. अर्थविश्वात कामगार चळवळीशिवाय दुसरी कुठलीही सामाजिक शक्ति अस्तित्वात नाही, कामगारवर्गच शोषित व श्रमिक जनतेचे नेतृत्व करतो. ती एक क्रांतिकारी शक्ती आहे. अशा वेळी संघटित कामगार चळवळीवर या सर्वांचे नेतृत्त्व करण्याची जबाबदारी आली आहे. कामगारांचे हक्क त्यांना पुन्हा मिळवून देणे हे या चळवळीचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. मरगळ झटकून हे काम करण्यास सज्ज झाले पाहिजे. आज कंत्राटी पद्धत दृढ होत आहे. या कंत्राटी पद्धतीत नोकरीची कोणतीच शास्वती नाही. मालकाने, उद्यापासून घरी बस कामाला येऊ नकोस असे सांगितले तरी त्याला गप्पा बसावे लागेल. न्याय मागण्यासाठी सुद्धा तो कुठल्या न्यायालयात वगैरे जाऊ शकत नाही.शेवटी त्या कामगाराला हलाखीचे जीवन कंठावे लागणार आहे. कुटुंबाची चाललेली उपासमार त्याला उघड्या डोळ्यांनी बघावी लागणार आहे. पण आजच्या कामगार चळवळी कंत्राटदारांची युनियन बांधून कंत्राटी पद्धतीचा स्वीकार करीत आहेत. असे ते आपसूकपणेस्वतः सांगत आहेत. हे कंत्राटी कामगार आस्थापनात आपण पुढे कायम होऊ या आशेवर युनियनचे सभासद होत आहेत व कामगार संघटनाही वर्गणी घेऊन त्याला सभासद करून घेत आहेत.वर्गणीदार वाढवण्यासाठी कंत्राटी कामगाराला युनियनचे सदस्य करून घेत आहेत पण ते सरकारच्या ध्येयाला बळकटी प्राप्त करून देत आहेत. हे लक्षात कुणी घेत नाही. त्यामुळे या पुढे देशात एकही कामगार कर्मचारी कायम स्वरूपाची नोकरी करीत असल्याचे कुठे दिसणार नाही. तसेच त्यावेळी कामगार चळवळ जिवंत असूनही ती मेल्यासारखी असणार आहे. या कामगार संघटनांना त्यावेळी काहीच काम नसेल. ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

### पालिकेत लोण

केंद्र सरकारच्या या कंत्राटी कारणाचे लोण सर्व शासकीय कार्यालयातही हळू हळू पसरू लागले आहेत. नवीन कायम स्वरुपी पदासाठी भरती केली जात नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेत आणि पालिकेचे एक अंग असलेल्या बेस्ट उपक्रमातही हे लोण पसरले आहे. कामगार संघटनाही क्षणिक फायद्यासाठी ते स्वीकारत आहेत. असे दिसून येत आहे. महापालिकेतील प्रशासन घनकचरा व्यवस्थापन विभागातील मोटार लोडर चे काम तसेच परिवहन सेवेचे खाजगीकरण करण्यास उतावीळ झाले आहे. पालिकेत २८ हजार कामगार या खात्यात होते. ते आज निम्मेही राहिले नाहीत. कंत्राटी कामगारांची भरती करून साफ सफाईचे काम करून घेत आहे. घरोघरी जाऊन कचरा गोळा करायचे काम सुद्धा कंत्राटी पद्धतीने मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आता संपूर्ण विभागच कंत्राट पद्धतीने दिला तर आज जे काही कायम कामगार शिल्लक राहणार आहे. त्याच्या नोकरीवर गदा येणार आहे. त्यामुळे पालिकेत सर्व कामगार संघटनांच्या नेत्यांची समन्वय समिती असताना घनकचरा खात्याचे खाजगीकरण होऊ देणार नाही. त्याला विरोध करण्यासाठी नेत्यांनी संघर्ष समिती नेमली होती. संघर्ष समितीने या खाजगीकरणाला विरोध करण्यासाठी पालिका प्रशासनाला अर्ज विनंत्या केल्या ,चर्चा केली. कामगार मेळावे, परिमंडळ निहाय आंदोलने, संप करण्याबाबत कामगारांचे १५ जुलै २०२५ रोजी मतदान घेण्यात आले.कामगारांनी संप करण्याच्या बाजूने मोठ्या संख्येने मतदानात भाग घेतला व सानप करण्याची भूमिका घेतली. पण तरीही प्रशासन खाजगीकरणाच्या मुद्द्यांवर कायम राहिले होते म्हणून मग संघर्ष समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर या गोष्टी घालण्यासाठी १७ जुलै रोजी आझाद मैदानात मोठा मोर्चा काढला.नेत्यांमी मुख्यमंत्र्यांची विधानभवनात भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी नेत्यांच्या सर्व मागण्या मंजूर केल्या.कामगारांच्या मागण्यांमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाचे खाजगीकरण करण्यासाठी काढलेल्या टेंडर प्रक्रियेमुळे कामगारांच्या हिताला बाधा येऊ न देणे, कंत्राटी कामगारांना कायम करणे, कामगारांची पदे सुरक्षित ठेवणे, लाड-पागे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे याचा समावेश होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: या.मागण्या मान्य करून पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना कामगार नेत्यांशी चर्चा करून प्रश्न सोडवावावा असे सांगितले होते. त्या प्रमाणे कामगार नेत्यांनी २२ जुलै रोजी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन चर्चा केली व २८ जुलै २०२५ रोजी प्रशासनाबरोबर कामगार नेत्यांनी करार केला. आणि तिथेच घोळ झाला आहे. या कराराने घनकचरा विभागातील कामगारांमध्ये सर्वच कामगार संघटनां बद्दल चीड निर्माण झाली आहे. कामगार नेत्यांचा त्यांनी निषेध केला आहे. सर्व युनियनचे झेंडे काढून त्यांनी फाडून टाकले. कामगार संघटनांची मान्यता रद्द करण्याची मागणी हे सफाई खात्यातील कायम कामगार करू लागले आहेत. सफाई कामगारांची ही प्रतिक्रिया दुर्लक्षून चालणार नाही. पण कामगार नेत्यांनी ती गंभीरपणे घेतलेली दिसत नाही. कामगार नेत्यांच्या संघर्ष समितीने घनकचरा व्यवस्थापन विभागातील मोटार लोडर व परिवहन विभागाच्या खाजगीकरणासाठी महापालिकेच्या १४ मे २०२५ च्या निविदेला कामगार संघटनांचा विरोध न राहता संबंधित न्यायप्रविष्ट प्रकरणेही मागे घेण्यात येणार आहेत. असा करार करण्यात आला आहे.व त्या बदल्यात तब्बल ८ हजार कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर करारानुसार, घनकचरा व्यवस्थापन व परिवहन विभागातील कोणतेही पद कमी करण्यात येणार नाही, तसेच कोणतेही यानगृह बंद केले जाणार नाही. सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा व शर्ती त्या-त्याच स्वरुपात कायम ठेवण्यात येणार आहेत. मोटर लोडर संवर्गातील ७०-७५ टक्के कर्मचाऱ्यांना सध्याच्या कामाशी सुसंगत काम दिले जाईल, तर उर्वरित कर्मचाऱ्यांसाठीही तत्काळ उपाययोजना करण्यात येणार आहेत. या करारात , लाड पागे समितीच्या शिफारसींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णय क्रमांक सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ च्या अंमलबजावणीसाठी ४५ दिवसांत लाभार्थी कामगार निश्चित करण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन केली जाणार आहे. तसेच, न्यायालयात प्रलंबित असलेल्या कंत्राटी कामगारांच्या कायमपणाच्या मागण्यांबाबत स्वतंत्र समिती गठीत करून ६० दिवसांत प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि त्या दरम्यान कोणत्याही कामगाराला सेवेतून कमी केले जाणार नाही. हे कामगार कायम झाल्यानंतर त्यांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांचा मागोवा घेऊन ती मागे घेतली जातील. याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सर्व सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवून देण्यासाठी महापालिका आयुक्त स्वतः शासनाकडे पाठपुरावा करणार आहेत.

असे ठरविण्यात आले आहे. हा करार म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समितीतील दि म्युनिसिपल युनियन, म्युनिसिपल मजदूर युनियन, कचरा वाहतूक श्रमिक संघ यांसह अन्य नोंदणीकृत संघटनांच्या पुढाकाराने साकार झाला. म्हणजे ज्या साठी सर्व नेत्यांनी एकत्र येऊन संघर्ष केला त्या खाजगीकरणाच्या प्रश्नाला मान्यता देऊन इतर मागण्या पदरात पाडून घेतल्याचा समज घनकचरा खात्यातील कायम कामगारांनी करून घेतला आहे व म्हणून ते चीड व्यक्त करीत आहेत.या खात्यात खाडा बदली कामगार ८ - ९ वर्षापासून काम करत आहेत. २४० दिवस भरल्यानंतर त्यांना कायम करणे आवश्यक आहे तसे १९९० चे परिपत्रक आहे. त्यांना कायम न करता कंत्राटी कामगारांना कायम करण्यात येणार आहे. त्यामुळे या खाडा बदली कामगारांमध्ये न्यूनगंडाची भावना पसरली आहे. आम्ही खाजगीकरणाच्या विरोधात मतदान केले. आणि इथे कंत्राटी कामगारांना कायम केले जात आहे. हा कुठला न्याय,असा प्रश्न ही कामगार विचारात आहेत. या कामगारांनी एकत्र येवून एल ओ डि आर, आणि पिटी डिआर संघर्ष समिती स्थापन केली आहे. या समितीच्या वतीने ८ ऑगस्ट रोजी दादरला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे एक सभा घेऊन हा करार कामगाराच्या विरोधात करण्यात आल्याची भावना व्यक्त करून युनियनच्या नेत्यांना चाले जाव चा इशारा दिला आहे. या पुढे प्रत्येक वार्डमध्ये कामगार प्रतिनिधी नेमून या करारा विरोधात जनजागृती करून ते कशा प्रकारे रद्द करता येईल व घनकचरा विभागातील कामगारांना कसा न्याय मिळेल हे पहिले जाणार आहे. त्या नंतर पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन झालेला करार रद्द करण्याची मागणीही ते करणार आहेत. खरे तर या कामगारांमध्ये निर्माण झालेली चीड कामगार नेत्यांनी समजून घेण्याची गरज आहे. पालिकेच्या घनकचरा खात्यात काम करणारा कामगार हा भलेही मागासवर्गीय जातीत जन्माला आला असेल, तो अशिक्षित व गरीब असेल म्हणून त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यांच्यावर झालेला हा अन्याय आहे.या अन्यायाविरोधात तो उभा ठाकला आहे. त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी, त्यांच्यात झालेले समज गैरसमज काय आहे. ते समजून घेण्यासाठी कामगार नेत्यांनी या कामगारांची भेट घेऊन एकत्र बसून चर्चा केली पाहिजे. व हा संघर्च संपवला पाहिजे असे वाटते.

## पत्र मानस

### ऑनलाइन गेम्स : नवे संकट

भारतात ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे व्यसनाधीनता, मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम, तसेच आर्थिक शोषण यांसारख्या समस्या गंभीर स्वरूपात दिसत आहेत. अनेक युवक अभ्यास, झोप आणि सामाजिक आयुष्याकडे दुर्लक्ष करून सतत गेम खेळतात, ज्यामुळे चिडचिडेपणा, तणाव आणि चिंता वाढते. या समस्यांवर उपाय म्हणून वेळेची मर्यादा, पालक नियंत्रण, खर्चाची मर्यादा, वय तपासणी प्रणाली, तसेच या गेम्सचे प्लॅटफॉर्म रद्द करणे आवश्यक आहे. तसेच, सायबरसुरक्षा आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण हा एक गंभीर मुद्दा आहे. अनेक गेम्स वापरकर्त्यांकडून वैयक्तिक तपशील घेतात, ज्यामुळे फसवणूक आणि डेटा चोरीचा धोका वाढतो. यासाठी राष्ट्रीय सायबर सुरक्षा निकष, सामग्रीचे नियमन, AI-आधारित फिल्टर्स, चॅट मॉनिटरिंग, आणि कडक समुदाय मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आहेत. यासोबतच शाळा, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन सकारात्मक डिजिटल वर्तन प्रोत्साहन देणाऱ्या मोहिमा राबवणे, हेही दीर्घकालीन समाधान ठरू शकते.

**- श्री आल्हाद माळगावकर पनवेल**

### निवडणूक निकाला बाबतीतील प्रतिक्रिया इतक्या उशीरा नको

देशातील तसेच महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन राज्यातील निवडणूक निकालावर आजही विरोधक म्हणजे इंडिया आघाडी आणि मविआ समाधानी नाही उलट ईव्हीएम मशीन वर कायम संशय व्यक्त करत आहे. आतातर खा. शरद पवार यांनीच सांगितले आहे की त्यांच्याजवळ दोन माणसे भेटायला आली होती आणि तब्बल ऐकशे साठ विधानसभेच्या जागा जिंकून देण्याची गँरटी देखील दिली होती. खा.शरद पवारानी त्यांना खा.राहुल गांधी यांच्याकडे नेले मात्र नंतर दोघांनी त्या मार्गाने जायाचे नाही असे ठरवले. विशेष म्हणजे त्या अनोळखी दोन्ही व्यक्तींचे नावे व पत्ते खा.शरद पवारांच्याकडे नसल्याचे त्यांनी स्वतः यापुर्वीच स्पष्ट केलेले आहे. थोडक्यात कुठलाही ठोस पुरावा नसतानाही माध्यमातून फक्त उलटसुलट विधाने करायची तीही निवडणूक निकाला नंतर म्हणजेच इतक्या उशीरा थोडक्यात आरोप अर्थात विधान चुकीचे व निवडणूक यंत्रणेची पर्यायाने देशाची बदनामी करणारी ठरत आहे,असे वाटते.

**- श्री संजय गंगाराम साळगांवकर, मुंबई**

### ईडीच्या कारवाईवर गंभीर प्रश्नचिन्ह?

सक्तवसुली संचालनालयाने 'मनी लॉन्डरिंग' प्रकरणांतील २३ हजार कोटी रुपये जप्त करून ते आर्थिक गुन्ह्यांचा फटका बसलेल्या संबंधित पीडितांना वितरित केले. ईडीने जप्त केलेला काळा पैसा नव्हता का? तो काळा पैसा नव्हता तर जप्त का केला?ईडीच्या अशा कारवाईमुळे विश्वासार्हता गमावली आहे.ईडीच्या दोषसिद्धीचे प्रमाण अल्प का? अनेक प्रकरणे नोंदवूनही ईडी संबंधितांचे दोष सिद्ध करण्यास अपयशी ठरत असल्याचे निरीक्षण देखील न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायालयाला ईडीच्या प्रतिमेबद्दल चिंता वाटते.या तपास यंत्रणेला कायद्याच्या चौकटीतच काम करावे लागेल.सत्ताधा-यांच्या म्हणण्याप्रमाणे काम केल्यास दोषसिद्धी कमी होणार आहे.ईडीच्या कारभारावर कोणाचे नियंत्रण आहे का नाही? ईडीच्या अशा कारवाईमुळे ईडीचा या पुढील कारभार कसा असेल? तपास यंत्रणांचा राजकीय विरोधकांना तसेच दहशत पसरवण्यासाठी आणि व्यावसायिकांना लक्ष्य करण्यासाठी केंद्र सरकारकडून राजकीय सूडबुद्धीसाठी वापर होत असल्याने ईडीच्या अपराधसिद्धीचे प्रमाण अत्यल्प होत आहे. उच्च न्यायालयाने ईडीचा दबाव टाकून पक्ष फोडून सत्ता काबिज करण्यासाठी तपास यंत्रणांच्या वापरापासून सत्ताधा-यांना रोखले पाहिजे.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### शास्त्रसंमत गणेशमूर्ती घरी आणा !

श्री गणेश चतुर्थीला थोडेच दिवस शिल्लक राहिल्यामुळे आपल्या पसंतीची मूर्ती मिळावी यासाठी आतापासूनच या विक्री केंद्रावर गणेश भक्तांची रीघ लागायला सुरुवात झाली आहे. मागील काही वर्षांपासून देवतांच्या विविध अवतारांतील तसेच अन्य देवतांच्या, संतांच्या आणि महापुरुषांच्या रुपातील गणेशमूर्ती या विक्री केंद्रांवर मिळू लागल्या आहेत. प्रसिद्ध खेळाडू, राजकारणी, चित्रपटांतील गाजलेल्या व्यक्तिरेखा यांसोबत लहानग्यांच्या कार्टून विश्वातील पात्रांच्या आकाराच्या गणेशमूर्तीही बनवल्या जाऊ लागल्या आहेत. गणेशोत्सव काळात अशा स्वरूपातील मूर्ती घरी आणून आपण पूजन आणि विसर्जन नेमके कोणाचे करणार आहोत ? श्री गणेशाची मूर्ती नेमकी कशी असावी याविषयीचे शास्त्रीय विवेचन श्री गणपती अथर्वशीर्षात सविस्तरपणे सांगितले आहे. त्यानुसार पाटावर किंवा चौरंगावर विराजमान मृत्तिकेची म्हणजेच मातीची गणेशमूर्तीच गणेश चतुर्थीला घरी आणावी असे शास्त्र आहे. त्याऐवजी विविध रूपातील गणेशमूर्ती आणून ती पुजल्याने पूजकाला त्यातून अपेक्षित लाभ होत नाही. उलट यातून श्री गणेशाचा अवमानच होतो. गणेशमूर्ती घरी आणताना आपली आवड निवड बाजूला ठेऊन शास्त्र विचारात घेतल्यास त्याचा लाभ आपल्याला निश्चितच होणार आहे, त्यामुळे यंदा अन्य कोणत्या रूपातील नव्हे, तर शास्त्रसंमत गणेशमूर्तीचे घरी आणूया.!

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## बिबट्याचा हल्ला; वृद्ध महिला गंभीर जखमी

**नंदुरबार :** नंदुरबारच्या तळोदा तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना सातत्याने घडत आहे. अशात पुन्हा एक बिबट्याकडून हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. तळोदा येथून बाजार करून घरी परत जाणाऱ्या एका वृद्ध महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात महिला जखमी झाली असून महिलेवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील बहुतांश भाग हा सातपुड्याच्या डोंगर रांगांमध्ये वसलेला आहे. यामुळे या जंगल परिसरात वन्य प्राण्यांचे वास्तव्य पाहण्यास मिळते. तर शिकारीच्या शोधात वस्तीत येत बिबट्यांकडून हल्ला केल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. यात अनेकांचा जीव गेला आहे. तर काहीजण जखमी झाले आहेत. तळोदा शहरापासून तीन किमी अंतरावर काझिपुर- तलावडी रस्ता दरम्यान घटना घडली आहे.तळोदा तालुक्यातील काजीपुर तलावडी रस्त्यावर मंदिर जवळ बावी सांगल्या वळवी (वय ७०, रा. खुषगाव, ता. धडगाव) या बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाल्या आहेत. बावी वळवी या कामानिमित्ताने शिरीष माळी यांच्या फुलांचा शेतात रखविलदार म्हणून काम करतात. त्या तळोदा येथे बाजार करण्यासाठी गेलेल्या होत्या. तळोदा येथून बाजार झाल्यानंतर त्या घरी जाण्यासाठी पायीच निघाल्या होत्या.



म ह त्त्वा चे

### ट्रेमीमाईंड इंजेक्शनचा साठा जप्त; 6 जणांना अटक

**सांगली :** नशा आणि उत्तेजककेसाठी बेकायदेशीर वापरल्या जाणाऱ्या ट्रेमीमाईंड औषधी इंजेक्शनचा साठा सांगली पोलिसांनी जप्त करण्यात केला आहे. या कारवाईत दोन लाख पंधरा हजार किंमतीचे ५५८ इंजेक्शने बाटल्या जप्त करत पोलिसांनी ६ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे सांगली शहरात खळबळ उडाली आहे. नशा करण्यासाठी वेगवेगळ्या अमली पदार्थांचा वापर केला जात असतो. तर काही जण उत्तेजित द्रव्य घेऊन नशा करत असतात. प्रामुख्याने तरुणांकडुन नशा आणि उत्तेजक द्रव्य म्हणून ट्रेमीमाईंड औषधी इंजेक्शनचा वापर करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. सदरचे औषधी इंजेक्शन ऑनलाईन मागवून ते सांगली, कवठेमहांकाळ आणि आटपाडी या ठिकाणी ज्यादा दराने विक्री करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे.

### नांदेडच्या लॉजमध्ये आढळला शिक्षकाचा मृतदेह

**नांदेड:** नांदेडमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. लॉजमध्ये एका शिक्षकाचा मृतदेह आढळल्यानंतर खळबळ उडाली आहे. महादेव पिंपळगाव येथील लॉजमधून हा सर्व प्रकार उघडकीस आला. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवले. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. आशिष शिंदे असे मृत शिक्षकाचे नाव आहे. ते नांदेड येथील रहिवासी होते. कंधार तालुक्यातील एका खासगी शिक्षण संस्थेत ते शिक्षक होते. त्यांचा मृतदेह परिसरातील लॉजमध्ये संशयास्पद स्थितीत आढळला. नांदेडपासून जवळच असलेल्या महादेव पिंपळगाव येथील लॉजमध्ये हा सगळा प्रकार घडला आहे.

### फोटो मॉर्फ करून अश्लील व्हिडीओ तयार; गुन्हा दाखल

**अंबरनाथ:** सोशल मीडियाचा गैरवापर करून एका तरुणीचा पाठलाग करण्याचा आणि तिचे फोटो मॉर्फ करून अश्लील व्हिडीओ तयार करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी इंस्टाग्राम आयडी dp2211012, akshay22117734, Lawrence_bishnoi_70 आणि दोन मोबाईल क्रमांक धारकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अंबरनाथ पूर्वेतील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाज माध्यमांवर फॉलो करणे, मैत्रीसाठी तगादा लावणे असे काही प्रकार करत महिलांना त्रास दिला जात असल्याची काही प्रकरणे गेल्या काही वर्षात समोर आली आहेत.

### आरोपी खोक्याला जामीन मंजूर

**बीड :** बीडमधील आरोपी खोक्या ऊर्फ सतीश भोसले याला जामीन मंजूर झाला आहे. शिरूर पोलीस स्टेशनमध्ये त्याच्याविरोधात वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होता. याप्रकरणात त्याला अटक देखील करण्यात आली. सध्या तो बीड कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. पोलिसांनी खोक्याच्या घरावर छापा मारल्यानंतर वन्यप्राण्यांच्या शिकारीचे साहित्य, प्राण्यांचे मांस, गांजा आढळून आला होता. याप्रकरणी अँडव्होकेट राजन धसे यांनी युक्तिवाद केला होता.

# सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी जगातील सर्वोत्तम यंत्रणा व तंत्रज्ञान महाराष्ट्राकडे – मुख्यमंत्री

प्रतिनिधी
■ नागपूर

काही समाज विघातक लोकांनी समाजमाध्यमांवरून जातीय द्वेषमूलक चिथावणी दिल्यामुळे दंगली उसळलेल्या आपण पहिल्या आहेत. अशा गुन्हेगारीला आला घालण्यासाठी आता जगातील सर्वोत्तम यंत्रणा व तंत्रज्ञान महाराष्ट्राकडे आहे. अशा लोकांना हुडकून त्यांच्यावर तात्काळ कारवाईसाठी 'गरुड दृष्टी' हे टूल्स महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



नागपूर पोलीस विभागाच्या वतीने पोलीस भवन येथे 'गरुड दृष्टी' सोशल मीडिया मॉनिटरिंग व सायबर इंटेलिजन्स प्रकल्पाबाबत सादरीकरण आणि विविध सायबर आर्थिक गुन्ह्यांच्या तपासातून प्राप्त झालेल्या तब्बल 10 कोटी रुपये रकमेच्या वितरण समारंभात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते या रकमा फसवणूक झालेल्या संबंधित व्यक्तींना वितरित करण्यात आल्या. यावेळी पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलीस आयुक्त सर्वश्री वसंत परदेशी, राजेंद्र दाभाडे, शिवाजी राठोड व वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

स्वतःचे विचार मांडण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून सोशल मीडियाचा होणारा वापर उत्तम असला तरी काही समाज विघातक प्रवृत्ती द्वेष पसरवणे, धमक्या देणे, हेट स्पीच, फेक न्यूज, अंमली पदार्थांची तस्करीसाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करताना आपण पाहतो. यातील आर्थिक फसवणुकीचे प्लॅटफॉर्म बहुतांश परदेशी ऑपरेटर चालवतात. त्यामुळे सर्वांनी सावध असले पाहिजे. आपल्या मोबाईलवर कोणत्याही प्रकारच्या येणाऱ्या ऑफर्स आर्थिक फसवणुकीसाठी टाकलेले जाळे आहे हे लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. जर आपली आर्थिक फसवणूक झाली आहे हे लक्षात आल्यास शक्य तेवढ्या लवकर 1930 व 1945 या क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सोशल मीडिया माध्यमाद्वारे फसवणुकीच्या घटना रोखण्यासाठी 'गरुड दृष्टी' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून या प्लॅटफॉर्मवरील गुन्हेगारी हालचाली शोधून काढणे व त्यांचा मागोवा घेणे शक्य होईल. भविष्यात या टूल्सचा विस्तार आणि क्षमता वाढविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आज ज्या लोकांना त्यांचे पैसे मिळाले त्या व्यक्तींचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले. पोलीस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल यांनी प्रस्ताविक केले. उपायुक्त लोहित मतानी यांनी कार्यक्रमापूर्वी गरुड दृष्टी बाबत सादरीकरण केले. सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

उल्हासनगर पुन्हा हादरले

# चांदीबाई महाविद्यालयाबाहेर गुंडांचा सशस्त्र राडा; परिसरात दहशतीचे वातावरण

प्रतिनिधी
■ उल्हासनगर



चांदीबाई महाविद्यालयाजवळ असलेल्या राम नाष्टा या हॉटेलमध्ये कांदा द्यायला उशीर केला म्हणून एका ग्राहकाने वेटरला मारहाण करून चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी आरोपी मॉन्टी बहादूर करोतिया आणि बाबजी करोतीया या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली. तक्रारदार सुरजीत उर्फ अमरजीत मोतीराम यादव हे देसले यांच्या मालकीच्या राम नाष्टा हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मॉन्टी करोतिया आणि त्याचा साथीदार हॉटेलमध्ये भजी प्लेट खाण्यासाठी आले होते. यादव यांना त्यांना कांदा देण्यास उशीर झाल्याने करोतिया संतापला. त्याने यादव यांच्या छातीला पकडून त्यांच्या कानशिलात मारली.

यावेळी बाजूलाच मोरे चहा हे दुकान चालवणारे पुंडलिक मोरे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. या आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. यानंतर, मॉन्टी करोतिया हा हॉटेलमधून बाहेर गेला आणि मोटार सायकलच्या डिक्कीतून चाकूसारखे धारदार शस्त्र घेऊन परत आला. त्याने हवेत चाकू फिरवत पुंडलिक मोरे यांना मारण्याचा प्रयत्न केला. त्याने आजूबाजूच्या लोकांना आणि यादव यांच्यासोबत असलेल्या लोकांना धमकावले, "कोई बीच मे नही आयेगा, आया तो काट डालुगां." या घटनेमुळे घाबरून अनेक दुकानदारांनी आपली दुकाने बंद केली.

या घटनेनंतर आरोपींनी पुंडलिक मोरे यांना पुन्हा धमकावले व निघून गेले. यादव यांनी याबाबत मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी कलम ११५(२), ३५१(२), ३५२ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१), १३५ सह फौजदारी कायदा कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# भरधाव ट्रक 300 फूट खोल दरीत कोसळला, दोघांचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी
■ बुलढाणा

बुलडाण्यामध्ये ट्रकला भीषण अपघात झाला. भरधाव ट्रक ३०० फूट खोल दरीत कोसळला. या अपघातामध्ये ट्रकमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला. भिंगारा घाटामध्ये वळणावर ही घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. ट्रकमध्ये फक्त दोघेच होते की आणखी किती जण होते याचा शोध पोलिस घेत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरा - बुऱ्हाणपूर मार्गावरील भिंगारा घाटात ट्रकला अपघात झाला. भरधाव ट्रक ३०० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. अतिशय दुर्गम आणि चिंचोळ्या मार्गावर अपघात झाल्याने मदत कार्यात अडथळे येत आहेत. अपघाताची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह दरीतून काढण्याचे काम पोलिस आणि स्थानिक नागरिकांकडून सुरू आहे.

अपघातग्रस्त ट्रकमधून किती जण प्रवास करत होते याची माहिती घेण्याचं काम पोलिसांकडून सुरू आहे. विशेष म्हणजे या घाटातून अवजड आणि जड वाहनांना प्रवेश बंदी आहे. असे असताना देखील या मार्गावरून अवजड आणि जड वाहनांची वाहतूक सुरू असल्यामुळे आज ही अपघाताची घटना घडली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलिस सध्या या घटनेचा तपास करत आहेत.

# 'घरोघरी तिरंगा' मोहीमेंतर्गत सार्वजनिक स्थळांची लोकसहभागातून स्वच्छता

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

तिरंग्याविषयीचा राष्ट्राभिमान जागृत करणा-या घरोघरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा मोहीमेंतर्गत आज विविध विभागांमध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. स्वच्छ सर्वेक्षण 2025 अंतर्गत आयोजित या मोहीमा अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्रीम. स्मिता काळे आणि परिमंडळ 1



उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 उपआयुक्त श्री.संजय शिंदे व मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. राजेंद्र इंगळे यांच्या निरीक्षणाखाली राबविण्यात आल्या.

यामध्ये बेलापूर व नेरूळ विभागांनी संयुक्तपणे ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसरात बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त डॉ अमोल पालवे व नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त श्री. जयंत जावडेकर तसेच बेलापूर विभागाचे स्वच्छता अधिकारी श्री. नरेश अंधेर व नेरूळ विभागाचे स्वच्छता अधिकारी श्री.अरूण पाटील यांच्या नियंत्रणाखाली प्रभावी रितीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये 52 गोणी कचरा संकलित करण्यात आला. यामध्ये एसआयईएस महाविद्यालयाचे एनएसएस युनिटचे विद्यार्थी, नागरिक तसेच स्वच्छताकर्मी सहभागी होते.

वाशी विभागातही सहा.आयुक्त श्री. सुखदेव येडवे व स्वच्छता अधिकारी श्रीम. जयश्री आढळ यांच्या माध्यमातून वाशी मिनी सी शोअर जुहूगाव चौपाटी परिसरात टिळक कॉलेजचे एनएसएस विद्यार्थी यांच्या सहयोगातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# वाळू माफियांचा कुडाळात हैदोस महसूल पथकावर हल्ल्याचा प्रयत्न....

प्रतिनिधी
■ कुडाळ

### गुन्हा दाखल करून दोन्ही डंपर चालक ताब्यात; एकाची नंबर प्लेट बोगस ...




तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीची तपासणी करत असताना एका डंपर चालकाने महसूल पथकाच्या गाडीवर डंपर घालण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. ही घटना काल दुपारी नेरूर ते कुडाळ एमआयडीसी मार्गावर घडली. पोलिसांनी दोन डंपर चालकांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुडाळचे प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांनी काल चेंदवण आणि कवठी भागात अवैध वाळू उत्खननासाठी वापरले जाणारे आठ रॅम्प उद्ध्वस्त केले होते. ही कारवाई संपवून तलाठी आणि इतर कर्मचारी गाडीने कुडाळला परत येत होते. नेरूर नाका परिसरात आल्यावर त्यांना मालवणहून कुडाळच्या दिशेने येणारे दोन डंपर दिसले. पथकाने हात दाखवून डंपर थांबवण्याचा प्रयत्न केला. एक डंपर चालक थांबला, पण दुसऱ्याने वेगाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महसूल पथकाने त्याचा पाठलाग सुरू केला. थोड्या वेळाने पथकाने आपल्या गाडीने त्या डंपरला अडवण्याचा प्रयत्न केला, पण डंपर चालकाने गाडीवर डंपर घालण्याचा प्रयत्न केला. यात डंपरचे पुढचे चाक गाडीच्या मागील चाकाला धडकले. यानंतरही चालकाने पळ काढण्याचा प्रयत्न केला आणि वाटेतच डंपरमधील वाळू रस्त्यावर ओतून तो पुन्हा पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, महसूल पथकाने त्याला पकडले.

घटनेची माहिती मिळताच कुडाळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी दोन्ही डंपर चालकांना ताब्यात घेतले. निखिल नितीन परब या डंपर चालकावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न आणि सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, दुसऱ्या डंपरचा चालक आप्पासाहेब मदने आणि मालक संदीप दिचोलकर यांच्यावरही गुन्हा नोंदवण्यात आला आहे. एका डंपरची नंबर प्लेट बनावट असल्याचेही या तपासणीत समोर आले आहे. तहसील कार्यालयाने ही माहिती दिली.

# भूमिगत गटारे की मृत्यूचा शॉर्टकट ?



छाया : सुशांत पाटील

**दिवा ।** दिवा शीळ रोडवरील काही दिवसांपूर्वी भूमिगत गटारांची कामे झाली होती. कामे पूर्ण झाली. परंतु या संबंधित कंत्राटदाराला जेवढी डेडलाईन दिली होती. त्या डेडलाईनमध्ये संबधित काम पूर्ण केले नाही. दिवा शीळ रोडवरील प्रेरणा टॉवर बाहेरचा हे काम अजूनही अर्धवटच आहे. या अर्धवट कामामूळे या गटारामध्ये कोणीही पडून त्याचा मृत्यू होईल ही शक्यता नाकारता येत नाही. या परिसरामध्ये लहान मुले खेळ असतात. या गटारांवर साध झाकणंसुद्धा नाही. एखाद्याचा जीव गेल्यानंतर पालिका प्रशासनाचे डोळे उघडणार आहेत का, असा उद्वीग्न प्रश्न दिवेकर विचारत आहेत.

# मुंबई नाशिक महामार्गावर भीषण अपघात, वाहनांच्या रांगा



प्रतिनिधी
■ ठाणे

मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका भागात रविवारी सिमेंट मिक्सर वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून भीषण अपघात झाला. या अपघातामुळे मुंबई नाशिक महामार्गावर मोठ्याप्रमाणात कोंडी झाली होती. वाहनामध्ये १५ टन वजनाचे सिमेंट कॉंक्रीट होते. अपघातामुळे वाहनातील तेल रस्त्यावर सांडल्याने कोंडीत भर पडली. त्यामुळे भिवंडीहून ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांचे हाल झाले.

मुंबई नाशिक महामार्गावरील अंजुरगाव येथून सिमेंट मिक्सर वाहन घोडबंदरच्या दिशेने रविवारी सकाळी वाहतुक करत होता. वाहनामध्ये १५ टन वजनाचे सिमेंट कॉंक्रीट होते. हे वाहन सकाळी ११ वाजताच्या सुमारास खारेगाव टोलनाका परिसरात आले असता, चालक अरविंद गुप्ता याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहनाची धडक महामार्गावरील दुभाजकाला बसली. त्यामुळे वाहन उलटले.घटनेची माहिती वाहतुक पोलीस, ठाणे महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दलाला मिळाल्यानंतर पथके घटनास्थळी दाखल झाली. पथकांनी उलटलेले क्रेन यंत्राच्या साहाय्याने सरळ केले. तसेच ते रस्त्याच्या एका बाजूला करण्यात आले.

या अपघातामुळे खारेगाव टोलनाका, खारेगाव खाडी पूल या भागात वाहतुक कोंडी झाली होती. त्यामुळे भिवंडी, नाशिक येथून ठाणे, मुंबई आणि नवी मुंबईच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांना कोंडीत अडकावे लागले. अपघात झाल्यामुळे रस्त्यावरती तेल आणि इंधन पसरले होते. आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व अग्निशन दलाचे जवानांच्या मदतीने तेथे माती पसरवण्यात आली. त्यानंतर येथील मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली.

## मोबाइल हॅक करून सैनिकाला आठ लाखांचा चुना

**जळगाव :** सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. आमिष देत फसवणूक करण्याचे प्रकार वाढत असताना भारतीय सैन्य दलात कार्यरत जवानाला गंडा घालण्यात आला आहे. या जवानाचा मोबाईल हॅक करून घेत सुरवातीला ऑनलाईन कर्ज मंजूर करून घेतले. त्यानंतर खात्यातून ८ लाख रुपयांची रक्कम परस्पर वेगवेगळ्या खात्यात वर्ग करून घेण्याचा प्रकार घडला आहे.

# नागरिकांनी मोदी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

प्रतिनिधी
■ पनवेल

केंद्रातील मोदी सरकार हे विविध कल्याणकारी योजना नागरीकांसाठी राबवत आहे. या योजनांचा लाभ नागरीकांनी घ्यावा तसेच आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ठाकूर यांनी रोजबाजार येथे आयोजीत करण्यात आलेल्या करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिर आणि कल्याणकारी योजांच्या शिबिरावेळी केले. तसेच आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते यांच्या हस्ते झाले.



आ. प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमीत्त सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार भारतीय जनता पक्ष कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत आणि पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वतीने विविध कल्याणकारी योजना तसेच महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

यामध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी, मोफत आरोग्य मुल्यमापन तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी पेन्शन योजना, राष्ट्रीय वयोश्री योजना, आयुष्मान भारत योजना, तसेच ज्येष्ठ नागरीक कार्ड योजनेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले.

# बुध्द विचारातच सुख-समृध्दीचा मार्ग- गणवीर

प्रतिनिधी
■ नागपूर

### रमाई विहारात बुध्द पोर्णिमा साजरी



रमाई बुध्द विहार प्रबोधन कार्यक्रमात भुपेंद्र गणवीर यांना 'जनता ' ग्रंथ भेट देवून सत्कार करताना अध्यक्ष आदिनाथ श्यामकुवर व अन्य मान्यवर.

बौध्द तत्वज्ञान सुखी जीवन जगण्याचा मार्ग आहे. त्यामुळे हा विचार आत्मसात करा आणि सुख-समृध्दीकडे वाटचाल करा, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत - पत्रकार भुपेंद्र गणवीर यांनी केले.

गणवीर बुध्द पोर्णिमेनिमित्त रमाई बुध्द विहारात आयोजित प्रबोधन कार्यक्रमात बोलत होते. विहाराचे सभागृह खचाखच भरले होते. गणवीर पुढे म्हणाले, बुध्द धम्मातील पंचसूत्री माणसाला डोळस बनवते. त्यातून अन्य धर्मात आणि बुध्द धम्मात असलेल्या फरकाची रेषा गडद करते. बुध्दाने अनित्यं, करूणा, सजगता, मध्यम मार्ग आणि आत्मशोध दिला. जीवन फुलासारखे उमलते.एका क्षणी बहरते. दुसऱ्या क्षणी मावळते. तरी त्याच्या सौदर्यात कमी येत नाही. त्याप्रमाणे प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याचा आहे. जीवन हे अमुल्य आहे. त्याचा प्रत्येक क्षण सुखात,आनंदात घालवा. त्यासाठी बुध्दाची करूणा व सजगता आत्मसाथ करा.

अन्य धर्मांवर बोलताना गणवीर म्हणाले, अन्य धर्मांनी मंगळ, राहु, केतू, शनी आदी ग्रह, तारे सांगितले. पापपुण्य सांगितले. त्यांना शांत कराल. तरच सुखी व्हाल ! असे भय दाखवून पुरोहितशाही स्थापित केली. त्या माध्यमातून लुटीचा धंदा सुरू केला. ते पापपुण्य, व्रत, ग्रह,तार्‌यांची भीती लाथाडा.अन् शोषणाच्या पडयंत्रातून मुक्त व्हा. सुर्य उगवतही नाही आणि मावळतही नाही. हे विज्ञाननिष्ठांनी सिध्द केले. सुर्याभोवती पृथ्वी फिरते. त्यातून प्रकाश,अंधाराची प्रक्रिया घडते. हे समजून घेण्याची गरज आहे. बुध्दाची पंचसुत्री अनेक दाखले व घटनांच्या माध्यमातून समजावून सांगितले.

#### संघ-भांडवली साखळी तोडा

शेवटी अमेरिका व भारताच्या टॅरिफवादाला स्पर्श करताना गणवीर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगातले सर्वश्रेष्ठ अर्थतज्ञ होते. त्यांनी अनियंत्रित व्यापाराचा विचार दिला होता. त्यात जगात जे,जे धान्य,वस्तू स्वस्त असतील. त्यांची आपल्याला गरज असेल.तर त्यांची आयात करावी. अन् दुसर्‌या देशांना गरज असेल. त्या स्वस्त मालाची निर्यात करावी. जेणे करून जगातील सर्व गरिबांना स्वस्त माल मिळेल. यातून जगातील गोरगरिबांचे जगणे सुखकर होईल. हा जागतिक कल्याणाचा विचार होता. मात्र आरएसएस सारख्या संघटनांनी स्वदेशीच्या नावावर खोटाप्रचार केला आणि भांडवलशाही आणली. त्या भांडवालशाही आणि संघशाहीने हातात घालून सत्ता व संपत्ती आपल्या घशात घातली. 80 टक्के जनतेला गरीब व मध्यमवर्गीयात लोटले. ही जोडी, ही साखळी तोडण्यासाठी सज्ज व्हा. तेव्हाच नोकर्‌या, न्याय, समता, आरक्षण, खर्‌या स्वातंत्राची आणि स्वाभिमानाची भाकरी मिळेल. यासाठी तरूणांना जागवा, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन रमाई बुध्द विहाराचे सचिव दिलिप लेहगावकर यांनी केले. यावेळी अनेक मान्यवरांनी विहारास देणग्या दिल्या. लिमा गणवीर यांनी खीरदाव व दयानंद कांबळे यांनी फलदान केले.

# गिलच्या युवा भारतीय क्रिकेट संघाची कमाल

इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या शुभमन गिलच्या पाहुण्या युवा भारतीय क्रिकेट संघाने ५ सामन्यांच्या तेंडुलकर, अँडरसन चषक कसोटी मालिकेत सुरुवातीला १ - ०. नंतर २ - १ असे पिछाडीवर पडून देखील अखेर २ - २ अशी बरोबरी साधून कमाल केली असेच म्हणावे लागेल. मालिका सुरु होण्यापूर्वी भारतीय संघ इंग्लंडला येवढी जोरदार लढत देईल असे वाटले नव्हते. कारण भारत पहिल्यांदा रोहित, विराट, अश्विन या तीन अनुभवी खेळाडूंविना या मालिकेस सामोरा जात होता. त्यामुळे कागदावर तरी इंग्लंडचेच पारडे जड होते. तेथील लहरी वातावरण, वेगवान गोलंदाजांना साथ देणाऱ्या खेळपट्टया यामुळे भारतीय संघाची खरी कसोटी होती. त्यातच भारतीय प्रमुख अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रित बुमराह तीनच कसोटी खेळणार होता. परंतु असे असताना देखील त्यावर मात करीत भारताने मालिकेत साधलेल्या बरोबरीला तोड नाही. इंग्लंडने पहिली कसोटी ३७१ धावांचा यशस्वी पाठलाग करून जिंकली. १४९ धावांची शानदार खेळी करणारा सलामीवीर डकेत त्यांच्या विजयाचा शिल्पकार होता. त्याने क्रावली सोबत १८८ धावांची भागीदारी करुन इंग्लंडच्या विजयाचा पाया रचला. भारताच्या तळाच्या फलंदाजांनी दोन्ही डावात निराशा केली. तसेच तब्बल पाच झेल भारतीय क्षेत्ररक्षकांनी सोडले. दोन्ही डावात चांगल्या सुरवातीनंतर भारतीय फलंदाजी कोसळली. पंतने दोन्ही डावात शतके ठोकून आपण आता पूर्ण "फिट" असल्याचे दाखवून दिले. पहिल्या डावात भारताचे शेवटचे ६ फलंदाज ४१ धावांत तर दुसऱ्या डावात शेवटचे ५ फलंदाज ३१ धावांत माघारी परतले. याचा मोठा फटका भारतीय संघाला बसला. दुसऱ्या कसोटीत मात्रं भारताने इंग्लंडचा ३१८ धावांनी दणदणीत पराभव करून पहिल्या सामन्यातील पराभवाची परतफेड केली. भारतीय फलंदाजी



बहरली. मग त्यावर भारतीय गोलंदाजांनी सुरेख मारा करुन दुसऱ्या डावात इंग्लंडची दाणादाण उडवली. १० बळी घेऊन आकाश दिपने इंग्लंड फलंदाजीला वेसण घातले. इंग्लंडमध्ये कसोटीत १० बळी घेणारा तो पहिला भारतीय वेगवान गोलंदाज ठरला. ६०८ धावांचे आव्हान इंग्लंडसमोर होते. पण त्यांचा दुसरा डाव २७१ धावांत गडगडला. ऐतिहासीक लॉर्डस मैदानावर तिसऱ्या कसोटीत थरारक लढतीत भारताला अवघ्या २२ धावांनी पराभव पत्करायला लागला. २०२ धावांचे विजयी लक्ष्य भारताचे थोडक्यांत हुकले. जडेजाची नाबाद धावांची महत्त्वपूर्ण खेळी भारताला विजय मिळवून देऊ शकली नाही. कर्णधार स्टोक्स, आर्चरने दुसऱ्या डावात प्रत्येकी ३ - ३ बळी घेऊन भारताला विजयापासून दूर ठेवले. क्रावली, रुटने पहिल्या डावात दमदार शतके ठोकली. तर भारताचा सलामीचा फलंदाज राहुलने काढलेली शतकी खेळी व्यर्थ ठरली. पहिल्या तीन सामन्यांच्या तुलनेत चौथ्या कसोटीत धावांचा पाऊस पडला. त्यामुळे ही कसोटी अनिर्णित राहिली. भारताच्या पहिल्या डावामधील ३५८ धावांना उत्तर देताना इंग्लंडने पहिल्या डावात ६६९ धावांचा डोंगर रचला. इंग्लंडने पहिल्या डावात ३११ धावांची मोठी आघाडी घेतली. मग भारतासमोर सामना वाचवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले. कप्तान गिल बाद झाल्यानंतर भारत पराभवाच्या छायेत होता. पण अष्टपैलू जडेजा, सुंदरने तुफानी शतके करुन नाबाद २०३ धावांची भागीदारी ५ व्या विकेटसाठी करुन इंग्लंडच्या मालिका विजयाचे स्वप्न धुळीस मिळवले. हा सामना अर्निर्णीत राहिल्यामुळे मालिका बरोबरीत सोडवण्यासाठी भारताला शेवटचा कसोटी सामना जिंकण्याचे आव्हान होते. शेवटच्या ओव्हल कसोटीत भारताने अवघ्या ६ धावांनी नाट्यपूर्ण विजय मिळवून मालिका बरोबरीत सोडवण्यात यश मिळवले. हा सामना जिंकुन भारताने गोऱ्या साहेबांची चांगलीच जिरवली. कारण पहिली कसोटी जिंकल्यानंतर इंग्लंड संघातील काही फलंदाजांनी आंम्ही यापेक्षा जास्त धावांचा पाठलाग करून सामने जिंकू शकतो असे तारे तोडले होते. पण पहिल्या कसोटी विजयानंतर त्यांना नंतरच्या दोन कसोटीत धावांचा यशस्वी पाठलाग करता आलाच नाही. भारतीय गोलंदाजांनी इंग्लंड फलंदाजांची बोलती बंद केली. सिराजच्या तुफानी माऱ्यामुळे भारताने ओव्हल कसोटीत स्वप्नवत विजयाची नोंद केली. १९७१ साली याच मैदानात अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने इंग्लंडमध्ये आपल्या पहिल्याच विजयाची ऐतिहासीक नोंद केली होती. आता तब्बल पाच दशकांहून अधिक काळ लोटल्यांनंतर भारतीय संघाने येथे पुन्हा एकदा विजय मिळवुन त्या जुन्या विजयाच्या आठवणीना उजाळा दिला. तसेच विदेश दौऱ्यात पहिल्यांदा शेवटची कसोटी जिंकण्याचा पराक्रम केला. भारतीय कसोटी सामन्यांच्या आजवरच्या इतिहासात सर्वात कमी धावांनी देखील भारताने विजय मिळवण्याची ही पहिलीच वेळ होती. पहिले चार दिवस सामन्यावर वर्चस्व गाजवणाऱ्या इंग्लंडच्या विजयाचा घास शेवटच्या दिवशी सिराजने काढून घेतला. चौथ्या दिवशी तुफानी शतकी खेळी करून बुक्रसने इंग्लंडला विजयाच्या समीप नेले होते. तो १९ धावांवर असताना कृष्णाच्या गोलंदाजीवर सिराजने त्याचा झेल सोडला होता. तेव्हा सिराजवर जोरदार टीका झाली होती. पण याच सिराजने त्या चुकीची भरपाई करुन आपल्या टीकाकारांना चोख उत्तर दिले. चौथ्या दिवसाचा खलनायक असलेला जिगरबाज सिराज शेवटच्या दिवशी भारतीय विजयाचा खरा नायक बनला. आपल्या कसोटी कारकिर्दितील सर्वोत्तम गोलंदाजी करताना त्याने सामन्यात एकूण ९ बळी टिपले. त्याला कृष्णाने ८ बळी घेऊन चांगली साथ दिली. बुमराहच्या गैरहजेरीत दोन्ही कसोटीत त्याने भारतीय वेगवान गोलंदाजाची धुरा समर्थपणे संभाळताना आपली जिगर, चिकाटी दाखवून दिली. सिराज ने या मालिकेत २३ बळी घेऊन इंग्लंडमध्ये सर्वाधिक बळी घेणाऱ्या बुमराहच्या विक्रमाची बरोबरी केली. भारतीय संघाचा या दौऱ्यातील हा विजय सांघिक विजयाचा उत्तम नमुना होता. संघातील प्रत्येक खेळाडूने या दोन कसोटी विजयात हातभार लावला. कप्तान गिलने कर्णधार पदाचा दबाव आपल्या फलंदाजीवर होऊ दिला नाही. त्याने मालिकेत सर्वात जास्त धावा केल्या. वास्तविक गिल खर तर सलामीचा फलंदाज. पण संघ हितासाठी त्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय शंभर टक्के यशस्वी झाला. शेवटचा कसोटीचा अपवाद वगळता त्याने पहिल्या चार

सुहास जोशी
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

कसोटीत जोरदार फलंदाजी केली. कर्णधार म्हणून त्याचा हा पहिलाच कठीण दौरा होता. पण आपल्या पहिल्याच खडतर दौऱ्यात गिलने आपल्या नेतृत्वाची चांगली चुणुक दाखवली. गोलंदाजीत आणि क्षेत्ररक्षणात त्याने केलेले बदल भारतीय विजयास कारणीभूत ठरले असे म्हटले तर वावगे ठरू नये. काही चुका त्यांच्याकडून झाल्या. पण भावी काळात अनुभवाने तो अधिक परिपक्व होईल यात शंका नाही. जैस्वाल, राहुल जोडीने आघाडी फळीत चांगली चमक दाखवली. जैस्वालने पहिल्या दोन कसोटीत झकास शतके ठोकून मालिकेत सुरेख सुरुवात केली. राहुलच्या फलंदाजीत आता आधिक परिपक्वता येत चालली आहे. त्यामुळे सध्या तो भारतीय संघाचा राहुल द्रवीड आहे असे म्हणावे लागेल. जडेजाने या मालिकेत सातत्याने फंलादाजीत छान कामगिरी केली. त्याला वॉशिंग्टन सुंदरची तेवढीच तोलामोलाची साथ मिळाली. चौथी कसोटी वाचवण्याचे मोठे श्रेय या दोघाना द्यावे लागेल. पण जडेजा गोलंदाजीत मात्र आपला फारसा प्रभाव पाडू शकला नाही. तो फलंदाज म्हणून या मालिकेत चमकला. सुंदरच्या रुपाने या मालिकेत भारताला एक चांगला अष्टपैलू खेळाडू मिळाला. यष्टीरक्षक पंतने आपल्या तुफानी फटकेबाजीची झलक पेश करुन भारतीयच नव्हे तर इंग्लंड क्रिकेट प्रेमींची मने जिंकून घेतली. चौथ्या कसोटीत पायाला जबर दुखापत झाली असताना देखील त्याची फिकीर न बाळगता तो दुसऱ्या दिवशी मैदानात फलंदाजीला आल्यानंतर सर्व जण अवाक झाले. पहिल्या कसोटीत दोन्ही डावात शतके ठोकून पंतने इंग्लंड गोलंदाजांना धोक्याचा इशारा दिला होता. पंतसारखा लढाऊबाणा इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू ख्रिस व्होक्सने दाखवला. शेवटच्या कसोटीत त्याच्या खांद्याला दुखापत झाल्यामुळे तो पहिल्या डावात फलंदाजीला आला नाही. दुसऱ्या डावात तो गोलंदाजी पण करु शकला नाही. इंग्लंडला विजय मिळवता यावा म्हणून शेवटचा दिवशी तो डाव्या हाताला मोठे पैलस्टर असताना मैदानात आला. त्याने ॲटकिन्सला सोळा मिनिटे बॅट एकाच हातात घेऊन साथ दिली. पण शेवटी ॲटकिन्सचा त्रिफळा सिराजने उडवून सामना संपवला. या मालिकेत संघ व्यवस्थापनाने कुठला धोका पत्करायचा नाही हे धोरण आखले होते. त्यामुळे कुलदीप सारख्या सर्वोत्तम रिस्ट स्पिन फिरकी गोलंदाजाला एक ही सामन्यात खेळवले नाही. या मालिकेतील बरोबरीमुळे संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना मोठा दिलासा मिळाला. अन्यथा त्यांची या पदावरुन गंच्छती अटळ होती. या रंगदार कसोटी मालिकेमुळे टेस्ट क्रिकेट हेच असली क्रिकेट आहे याचा पुन्हा प्रत्यय आला. भारतीय संघाची दुसरी फळी किती सक्षम आहे हे या मालिकेने दाखवुन दिले. आता कामगिरीतील हेच सातत्य आगामी मालिकांत भारतीय संघ दाखवतो का ते बघायचे. २०१८ साली इंग्लंडने भारतात विरुद्धची शेवटची कसोटी मालिका जिंकली होती. त्यानंतर गेली ७ वर्षे इंग्लंड संघ भारताविरुद्ध मालिका विजयासाठी प्रतिक्षेत आहे. सध्या तरी त्यांना अजून बराच काळ मालिका विजयाची प्रतिक्षा करावी लागणार असेच चित्र दिसत आहे. ■

# निवडणूक आयोगाचे सरकारी दलाल...

**देशाच्या** बहुतांश शासकीय यंत्रणांमध्ये सरकारी दलालांचा उच्छाद पराकोटीने वाढला आहे. सरकारच्या हातचं बाहुलं बनलेल्या या यंत्रणांवर प्रचंड टीका होऊनही त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होत नाही. अगदी न्यायालयांनीही कान उपटले तरी तिथे बसलेल्यांनी आपल्यातला मुर्दाडपणा सोडला नाही. या यंत्रणांमध्ये अर्थातच देशातल्या निवडणूक आयोगाचा उल्लेख करावा लागतो आहे. देशातील निवडणुका या अपारदर्शक होऊ लागल्यापासून आयोगावर प्रचंड टीकेचे बाण सुटत आहेत. हा आयोग सत्ताधारी पक्षाचा बटिक झालाय, अशी टीका विरोधक कायमच करत आले आहेत. आपल्यावरचं बालंट दूर करण्यासाठी आयोगाचे अधिकारी पुराव्यांचं निमित्त करत पुन्हा सत्तेचे पाठिराखे बनतात. आयोगातील अधिकाऱ्यांच्या या वर्तणुकीने आयोगाची अक्षरश: पिसं निघालीयत. तिरुनेलाई नारायण अर्थात टीएन शेषन यांच्या काळातील निवडणूक आयोग आणि आताचा निवडणूक आयोग यातील फरक जमीन अस्मानाचा बनला आहे. शेषन यांच्या काळात सत्तेचा वापर करणाऱ्यांची अजिबात तमा बाळगली जात नव्हती. उलट विरोधी पक्षांचे असलेले अधिकार अबाधित राखत शेषन यांच्या काळात सत्तेला चाप बसला होता. पंतप्रधानांपासून मुख्यमंत्री आणि आमदार, खासदार दचकून असत. यामुळे निवडणुका या निर्धोक पार पडत. कोण किती मोठा याकडे न पहाता कठोर कारवाई होत असल्याने सत्तेतल्या पदाधिकाऱ्यांनाही आयोगाविरोधी ब्र काढण्याची हिंमत नव्हती. आज आयोगाच्या कारभारावर उठसूठ टीका होते ती ही आयोग सत्तेचा भागीदार बनला म्हणून. आपल्या हाती न्यायिक अधिकार असल्याचा फायदा घेत आक्षेप फेटाळण्याची नवी पध्दतच आयोगाने अंगिकारली आहे. यात सर्वाधिक आक्षेप अर्थातच विरोधकांचे असल्याने तिथे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होऊ लागला आहे. सत्तेविरोधी ब्र काढण्याची हिंमत त्यांच्यात राहिली नाही. परिणामी प्रश्न आयोगाला कोणी विचारला की सत्ताधारी हे दलाल बनून आयोगाच्या प्रश्नांची उत्तरं देऊ लागतात. सत्ताधाऱ्यांच्या या कृतीची सर्वत्र निर्भत्सना होऊनही त्यांनी लाज सोडली नाही. असं होतं तेव्हा चोर कोण हे कोणास सांगावं लागत नाही.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयोगाच्या कारभाराची लक्तरं काढल्यावर सत्ताधारी दलालांची फौज बाहेर आली आणि त्यांनी डोक्यातली चीप, पायातली वाण आणि जिभेच्या हाडांवर मजल मारली. देशात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीनंतरच्या सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतचोरीचा पर्दाफाश करणाऱ्या राहुल गांधी यांना खोटं ठरवण्यासाठी बाहेर आलेले सत्तेतले दलाल पाहिले की सत्तेसाठी त्यांनी किती चोऱ्या केल्या असतील, याचा अंदाज घेता येऊ शकतो. या दोन निवडणुकीदरम्यान झालेल्या कथित गैरप्रकाराचा पर्दाफाश करणाऱ्या विरोधी पक्ष नेत्यांनी अयोगाची बोलती बंद करून टाकल्याने आयोगाचे सत्ताधारी दलाल विरोधी पक्षनेत्याला खोटं ठरवण्याच्या मागे लागले आहेत. मात्र ही दलाली करताना विचारलेल्या प्रश्नांना तत्वाने उत्तरं देण्याऐवजी दलाल पळपुटेपणाचा आधार घेत आहेत. राहुल गांधी यांच्या सुमारे दीड तास चाललेल्या पत्रकार परिषदेत विधानसभा निवडणुकीतील चोऱ्यांचा एकेक पैलू बाहेर येऊ लागल्यावर पळताभूई थोडी व्हावी, अशी अवस्था आयोगाची झाली. झाल्या चोऱ्यांचा आयोगाला खुलासा करता येईना, हे लक्षात आल्यावर दलालांनी कंबरेचं सोडून प्रहार सुरू केले आहेत. चार हजार किलोमीटरची भारतजोडो पदयात्रा पूर्ण केल्यावर त्याचे परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आले. चारशे पारचा नारा




प्रविण पुरो



देणाऱ्यांना तोंडघशी पाडलं. ज्या ठिकाणी चांगलं यश मिळालं त्याच मतदारसंघातील विधानसभेच्या जागांवरील इंडिया आघाडीचे उमेदवार मोठ्या फरकाने निवडणूक हरत असल्याचं पाहून राहुल यांना आश्चर्य वाटणं स्वाभाविक होतं. तिथे अनेक पोलिंग बूथवर आघाडीच्या उमेदवाराला मतच पडलं नाही, असं राहुल यांच्या निदर्शनात आल्यावर याचा माग घेण्याचा निर्धार केला. आणि सहा महिन्यांपासून त्यांनी विशेष मोहीम चालवली होती. आयोगात एकेकाळी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांना सोबत दिली आणि पराभव होऊ शकत नाहीत, असे महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्यप्रदेश आणि कर्नाटक राज्यातील मोजके मतदारसंघ निवडले. आयोगाकडून डिजिटल डेटा मिळवण्याचा प्रयत्न केला. पण तो राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला नाही. अखेर मोजक्या माहितीच्या आधारे मतदार याद्या या टीमने हेरल्या. मतदारांचा शोध सुरू केला. आयोगाच्या नाकावर टिच्चून भाजपने केलेल्या लबाड्यांचा शोध घेता आला. एकेका मतदाराच्या पत्त्यावर त्याला गाठून या टीमने 10 बाय 10 च्या एवढ्याच्या खोलीत राहणाऱ्या 70 जणांचाही माग घेतला आणि एकाचवेळी दहा ठिकाणी मतदान करणाऱ्यालाही शोधून काढलं. ज्यांचा तपशील नाही तोही या टीमने धुंडाळला. तरीही लाळघोट्या वाहिन्यांनी त्यांना खोटं ठरवण्याचा प्रयत्न केला. मात्र इंडिया टुडे आणि काही समाज माध्यमांनी त्या त्या ठिकाणी पोहोचत आरोपाची पुष्टी केली. आणि लबाडी बाहेर आली.


इतक्याशा खोलीत किती मतदार रहावेत याला काही मर्यादा? राहुल गांधी यांनी अशा ठिकाणी राहणाऱ्या 70 जणांचा पिच्छाच पुरवला. जयराम रेड्डी नावाची ही व्यक्ती बेलंदुरू येथील मुनरेड्डी गार्डन सोसायटीमध्ये 35 क्रमांकाच्या घरात गेल्या दोन महिन्यांपासून राहत होती. याच रेड्डीच्या घराचा पत्ता 70 मतदारांसाठी नोंदवला होता. सत्ता येईल, अशी शक्यता असलल्या छत्तीसगड आणि मध्यप्रदेशमध्येही असंच घडत होतं. मध्यप्रदेशच्या निवडणुकीत केवळ 65 जागा मिळाल्या. महाराष्ट्रातही असंच घडत गेलं. लोकसभेत सत्ताधाऱ्यांचा दोबीपछाड करणाऱ्या इंडिया आघाडीचा दारूण पराभव केवळ अशक्यच होता. एव्हाना पाच वर्षांच्या काळात पाच लाख मतदारांची नोंद होत नाही त्या राज्यात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान पाच महिन्यांच्या कालावधीत चक्क 29.5 लाख मतदारांची नव्याने नोंद झाली. जो आजवरचा विक्रम होता. महाराष्ट्राच्या आजवरच्या निवडणुकीत मतदारांची इतकी नोंद होऊ शकली नव्हती. वयाची 18 वर्षं पूर्ण करणाऱ्या युवकाला मतदानाचा नव्याने अधिकार मिळाला तेव्हाही नोंदीचं एवढं प्रमाण नव्हतं. हीबाब कोणालाही खुपणारीच होती. आघाडीच्या नेत्यांनी महाराष्ट्रातील मतदारांची यादी आणि मतदानावेळची व्हिडिओ रेकॉर्डिंग मागवली. ती द्यायला आयोगाने नकार दिला. तेव्हाच शंकेची पाल चुकचकली. यातच आयोगाने मतदान आणि त्यापूर्वीची व्हिडिओ चित्रिकरणं 45 दिवसात बेदखल करण्याचा निर्णय घेतला. यातून आयोगच मतदानाची चोरी करत असल्याचा संशय बळावला आणि अधिक त्रास नको म्हणून डिजिटल डेटा देण्याची मागणी करण्यात आली. तो आयोगाने नाकारला. डिजिटल डेटा देण्यात आला असता तर देशातील मतदानाची माहिती जमवणं अवघड नव्हतं. अधिकतर मतदारसंघात अशा चोऱ्या झाल्याचं उघड करता आलं असतं. हे लक्षात घेऊन डिजिटल डेटाची मागणी फेटाळण्यात आली.

अखेर अगदी मोजक्याच मतदारसंघांची माहिती गोळा करण्याची मोहिम हाती घेण्यात आली. आयोगालाच काय पण निवडून आलेल्या भाजपच्या आमदारालाही याची कुणकूण लागू देण्यात आली नाही. यातूनच देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघात 6 महिन्यात नोंद करण्यात आलेल्या 29 हजार 219 नव्या मतदारांची जंत्री गोळा करण्यात आली. या मतदारसंघात 4 हजार मतदारांच्या पत्त्यांची नोंदच नाही. काही पत्त्यांवर जाऊन माहिती घेण्यात आली तेव्हा जिल्हा निवडणूक आयोगाकडील यादीची नोंद जशीच्या तशी करण्यात आल्याचं सांगण्यात आलं. 263 मतदार बुथवर चक्क 4 टक्के, 20 बुथवर 20 टक्के तर चार बुथवर 40 टक्के मतं अधिकची नोंदली गेली. या शोध मोहिमेत एकाच मतदाराची अनेक ठिकाणी असलेल्या नावांची संख्या 11 हजार 965 नोंदली गेली. मतदार राहत असलेल्या ठिकाणचे पत्तेच गायब असलेली प्रकरण 40 हजार 9 सापडली. लहानशा घरात 20 ते 70 मतदार नोंदवले गेलेली प्रकरणं 10 हजार 452 शोधली गेली. मतदाराचे फोटोच नसलेल्या नोंदी 4,132 आढळून आल्या. फॉर्म 6 ची नोंद ही पहिल्या मतदारासाठी केली जाते. या निवडणुकीत 33 हजार 692 जणांनी असे फॉर्म भरले आणि त्यात 70 ते 90 वर्षांचेही मतदार आढळून आले. साडेसहा लाख मतदार असलेल्या मतदारसंघात लाखावर मतदार बोगस आढळून आले. राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेनंतर आयोगाची पुरती गोची झाली आहे. आता तर आयोगाच्या पोर्टलवरून मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, कर्नाटक या राज्यातील सारी माहिती हटवण्याचा प्रताप आयोगाने केला आहे. अयोगाच्या या मतचोरीने पुरती पोलखोल झाली आहे. तिला उत्तर देणं अडचणीचं जाणं हे सत्तेसाठी तापदायक असल्याने सत्तेतल्या या दलालांनी खुलाशांचा जुमला सुरू केला आहे.

*(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)*

# 'ॐ नम: शिवाय' कपड्यांवर नको !

श्रावण मास सुरु असल्याने सर्वत्रचे वातावरण भक्तिमय झाले आहे. श्रावण मासात शिवभक्त भगवान शिवाची विशेष भक्ती करतात. काही जण प्रत्येक सोमवार निर्जली उपवास करतात तर काही जण श्रावण मास पादत्राणे परिधान करत नाहीत, या मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरात शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. याच दिवसांत ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती



दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे.

जगन घाणेकर

जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेवढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय । सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल. ◆

## पोईसर जिमखाना येथे "राज्यस्तरीय सुवर्ण कलश एकांकिका स्पर्धा-2025" चे उद्घाटन संपन्न

**मुंबई ।** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद-बोरीवली शाखा आणि पोईसर जिमखाना यांच्या वतीने आयोजित, राज्यस्तरीय सुवर्ण कलश एकांकिका स्पर्धा २०२५ चे उद्घाटन नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह दामोदर उर्फ बाळा टेंबुलकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे माजी खासदार गोपाळ शेट्टी उपस्थित होते.या स्पर्धेत एकूण २६ संस्थांनी सहभाग घेतला आहे. उद्घाटन प्रसंगी, गोपाळ शेट्टी यांनी आपल्या भाषणात एकांकिका स्पर्धा आयोजित करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सहभागी सर्व संस्था आणि कलाकारांना शुभेच्छा दिल्या. व बोरीवलीतील साईबाबा नगरमध्ये लवकरच एक नवीन नाट्यगृह सुरू होणार आहे, ही स्थानिक नाट्यप्रेमींसाठी खूप आनंदाची बातमी आहे. असे सांगितले. या वेळी पोईसर जिमखान्याचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, पोईसर जिमखान्याचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, नाट्य परिषदेच्या बोरीवली शाखेचे अध्यक्ष प्रभाकर उर्फ गोट्या सावंत, उपाध्यक्ष मोहन परब व विश्वनाथ माने, स्पर्धेच्या न्यायाधीश सुप्रिया विनोद मतकरी, अभिनेते अनिल गवस, स्पर्धा प्रमुख संदीप जोशी, प्रदीप जोशी, प्रवीण पाटील आदी उपस्थित होते. पोयसर जिमखाना, कांदिवली येथे आयोजित उद्घाटन समारंभात लोकसेवक गोपाळ शेट्टी यांच्यासह कारेकर, राजन पिसाट. चंद्रकांत मोरे, समीर तेंडुलकर, सुरेश दळवी यांच्यासह नाट्य परिषदेच्या बोरीवली शाखेचे अधिकारी, समिती सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विराट - रोहित 2027चा वन डे विश्वचषक खेळण्यावर प्रश्नचिन्ह

# या स्पर्धेपर्यंत दोघेही वयाची चाळीशी गाठणार असल्याने सहभागाबत संभ्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत आणि इंग्लंडमधील पाच सामन्यांची कसोटी मालिका संपली आहे. यानंतर आता टीम इंडिया २०२५ मध्ये टी-२० स्वरूपात आशिया कप खेळताना दिसेल. याच दरम्यान मोठे संकेत मिळत आहे. भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली आता टी-२० आणि कसोटीनंतर एकदिवसीय सामन्यांमधून निवृत्त होऊ शकतात. कर्णधार रोहित शर्माला देशासाठी आयसीसीचा वन डे विश्वचषक जिकून मग निवृत्ती घ्यायची आहे. तसे रोहितचे प्रशिक्षक द्रोणाचार्य



दिनेश लाड यांनी स्पष्ट केले आहे. पण २०२७च्या विश्वचषक स्पर्धेसमयी विराट आणि रोहित दोघेही ४० वर्षाचे असतील.त्यामुळे त्यांच्या फिटनेसवर त्यांचे भविष्य अवलंबून असेल.

बीसीसीआयच्या एका सूत्राने दैनिक जागरणशी एका मोठ्या वृत्तपत्राशी बोलताना, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबद्दल सांगितले की, जर या दोघांना एकदिवसीय क्रिकेट खेळत राहायचे असेल, तर ऑस्ट्रेलियन दौऱ्यानंतर त्यांना डिसेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय सामन्यात होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी मालिकेतही खेळावे लागेल. रोहित आणि कोहली या वर्षी रणजी ट्रॉफी सामन्यात खेळताना दिसले होते. आता या स्थितीमुळे दोन्ही खेळाडू आगाऊ घोषणा करू शकतात की ऑस्ट्रेलियन दौऱ्यावरील त्यांची एकदिवसीय मालिका ही शेवटची असेल.

विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोन्ही खेळाडूंनी भारतीय क्रिकेटसाठी खूप काही केले आहे. पण आता त्यांच्या मागे तरुण खेळाडूंची मोठी रांग आहे. २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक लक्षात घेऊन संघ व्यवस्थापन तयारी करत आहे. रोहित आणि कोहली यांना आगामी एकदिवसीय विश्वचषकाच्या नियोजनात बसणे कठीण आहे." रोहित शर्मा आणि विराट कोहलीबद्दल बोलायचे झाले तर, २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर या दोन्ही खेळाडूंनी क्रिकेटच्या सर्वात लहान स्वरूपातून निवृत्ती घेतली. इंग्लंड दौऱ्यापूर्वी, दोघांनीही कसोटीतून निवृत्तीची घोषणा केली. आता २०२७ च्या विश्वचषकापर्यंत, दोन्ही खेळाडू ४० वर्षांचे होतील, त्यामुळे अशा परिस्थितीत, त्यांच्या संघात राहण्याची आणि खेळण्याची शक्यता कमी आहे.

**टीम इंडियाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील एकदिवसीय मालिका**

*१९ ऑक्टोबर, पहिला एकदिवसीय सामना, पर्थ*
*२३ ऑक्टोबर, दुसरा एकदिवसीय सामना, ॲडलेड*
*२५ ऑक्टोबर, तिसरा एकदिवसीय सामना, सिडनी*

## अश्विनचा संजू सॅम्सनला प्रश्न

# मी केरळमध्ये राहिलो आणि तुम्ही चेन्नईला परतलात तर कसे होईल?

वृत्तसंस्था
■ चेन्नई

भारत आणि राजस्थान रॉयल्स (RR) चा स्टार खेळाडू संजू सॅमसन सध्या आयपीएल ट्रेड विंडोमुळे चर्चेत आहे. अलिकडेच एक बातमी आली होती ज्यामध्ये असे म्हटले गेले होते की सॅमसनने त्याच्या फ्रँचायझीला सांगितले आहे की तो संघ सोडू इच्छित आहे.दरम्यान, भारताचा माजी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनने सॅमसनची मुलाखत घेतली आहे. यादरम्यान, अश्विन म्हणाला, माझे खूप प्रश्न आहेत, पण त्याआधी मी तुमच्याशी थेट येऊन बोलायला हवे असे मला वाटले. खूप अफवा सुरू आहेत, ज्याबद्दल मला स्वतःला काहीही माहिती नाही. म्हणून मी तुम्हाला विचारायचे ठरवले की, मी केरळमध्ये राहिलो आणि तुम्ही चेन्नईला परतलात तर कसे होईल?

अश्विनच्या प्रश्नावर संजू हसून म्हणाला , अण्णा, केरळमध्ये आयपीएल टीम नाहीये, त्यामुळे राज्यात राहण्यात काही अर्थ नाही. बघूया काय होतंय ते. ते देवावर सोडूया. ही मुलाखत शनिवारी अश्विनच्या कुट्टी स्टोरीज विथ ॲश या युट्यूब चॅनलवर प्रसिद्ध झाली. सॅमसनचा आयपीएल २०२५ चा हंगाम फारसा खास नव्हता. तो बहुतेक वेळा दुखापतग्रस्त होता. २०२५ मध्ये आरआर नवव्या स्थानावर राहिला.

संजू सॅमसनला खरेदी करण्यात सीएसकेला रस सीएसके, केकेआर आणि डीसी त्यांच्या संघात संजूला समाविष्ट



### अश्विन अण्णा सीएसके सोडण्याच्या तयारीत तर चेन्नई सॅम्सनला संघात घेण्याच्या मूडमध्ये

करण्यास रस दाखवत आहेत. एका मोठ्या इंग्रजी वृत्तपत्राच्या माहितीनुसार, पाच वेळा आयपीएल विजेता चेन्नई सुपर किंग्ज सॅमसनला त्यांच्या संघात समाविष्ट करू इच्छित आहे. २०२५ च्या अखेरीस, सॅमसनने अमेरिकेत सीएसके व्यवस्थापन आणि त्यांचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांचीही भेट घेतली.सॅमसन २०१३ ते २०१५ पर्यंत राजस्थानकडून खेळला. त्यानंतर तो दिल्ली डेअरडेव्हिल्स (आता दिल्ली कॅपिटल्स) कडून दोन वर्षे खेळला. त्यानंतर तो २०१८ मध्ये राजस्थानला परतला. त्याच्या नेतृत्वाखाली त्याने २०२२ मध्ये संघाला अंतिम फेरीत नेले. २००८ नंतर राजस्थान संघाने अंतिम फेरीत पोहोचण्याची ही पहिलीच वेळ होती. त्याने राजस्थानसाठी १४९ सामने खेळले आहेत आणि ४०२७ धावा केल्या आहेत. तो राजस्थानसाठी सर्वाधिक धावा करणारा आणि सर्वात यशस्वी कर्णधार देखील आहे.

# 15 ऑगस्टला बीओबी चषक 14 वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत ७ ते १४ वर्षामधील ६ वयोगटातील शालेय मुलामुलींची बीओबी चषक जलद बुध्दिबळ स्पर्धा १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना मान्यतेने प्रत्येक वयोगटातील गुणानुक्रमे पहिल्या १५ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक पुरस्कार दिले जातील. तसेच दोन वयोगटाचे विजेतेपद पटकाविणाऱ्या एका बुध्दिबळपटूला क्रीडाप्रेमी स्व. सुरेश आचरेकर स्मृती विशेष रोख पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनी दिली.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ही स्पर्धा परेल येथील आरएमएमएस वातानुकुलीन सभागृहात स्विस लीग पध्दतीच्या किमान ४ फेऱ्यांमध्ये रंगणार आहे. प्रत्येक साखळी फेरी १५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. संयोजकांतर्फे स्पर्धकांना बुध्दिबळ पट व घड्याळ दिली जाणार आहेत. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी (९३२४७ १९२९९) यांच्याकडे व्हॉटसअॅपवर १२ ऑगस्टपर्यंत संपर्क साधावा.



**पुणे ।** पुणे येथे खेळवल्या जात असलेल्या राज्य कॅरम स्पर्धेदरम्यान महाराष्ट्र कॅरम संघटनेचा २०२४-२५चा वार्षिक कार्यअहवाल बालेवाडी येथे महाराष्ट्र युवक कल्याण आणि क्रीडा विभागाचे सहसंचालक सुधीर मोरे,उप संचालक उदय जोशी,उप संचालक संजय सबनीस ,उप संचालक नवनाथ फडतरे ,सहायक आयुक्त मिलिंद दीक्षित यांना देण्यात आला.यावेळी राज्य कॅरम संघटनेचे सचिव अरुण केदार यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.अहवाल क्रीडा मंत्रालयाला सादर करून कॅरम संघटनेच्या पारदर्शक कारभाराची ग्वाही देण्यात आल्याचे सचिव केदार यांनी सांगितले.

## राज्य कॅरम स्पर्धेत झैद, प्रशांत, समृद्धीची आगेकूच

प्रतिनिधी
■ मुंबई

सनी निम्हण यांच्या पुढाकाराने सोमेश्वर फाऊंडेशन आयोजित गोविंदा गार्डन मंगल कार्यालय, पुणे येथे सुरु असलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या उप उपांत्य फेरीत ठाण्याच्या झैद अहमदने विश्वविजेत्या जळगावच्या संदीप दिवेचा तीन सेटपर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यात ११-२२, २५-४, २५-१६ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तर दुसरीकडे माजी विश्व् विजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेने पहिल्या सेटमध्ये आठव्या बोर्डात व्हाईट स्लॅमची नोंद करत मुंबईच्याच सिद्धांत वाडवलकरचा २२-१०, २२-१० असा सरळ दोन सेटमध्ये धुव्वा उडवत आगेकूच केली. महिलांच्या उप उपांत्य सामन्यात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने मुबईच्या उर्मिला शेंडगेचा तीन सेटमध्ये २५-६, १९-२१, २५-१९ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.



**पुरुष एकेरी उप उपांत्य फेरीच्या अन्य सामन्यांचे निकाल पुढील प्रमाणे.**
रियाझ अकबरला अली ( रत्नागिरी ) वि वि समीर अंसारी ( ठाणे ) २५-४, २३-१६ विकास धारिया ( मुंबई ) वि वि ओमकार नेटके ( मुंबई ) १७-१२, २५-०

**महिला एकेरी उप उपांत्य फेरीच्या अन्य सामन्यांचे निकाल पुढील प्रमाणे.**
प्राजक्ता नारायणकर ( मुंबई उपनगर ) वि वि पुष्कर्णी भट्टड ( पुणे ) १५-१३, २५-१ सोनाली कुमारी ( मुंबई ) वि वि नीलम घोडके ( मुंबई ) २५-२, १०-२५, २५-० केशर निर्गुण ( सिंधुदुर्ग ) वि वि आकांक्षा कदम ( रत्नागिरी ) १८-२३, २५-१४, २३-१८

## शिक्षकांच्या बी.डी.एस. प्रकरणी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा

### - महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांसाठी महत्त्वाची असलेली बी.डी.एस. प्रणाली (Budget Distribution System) मागील दोन महिन्यांपासून ठप्प झाल्याने हजारो कर्मचाऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. या प्रणालीद्वारेच वैद्यकीय बिलांची परतफेड, भविष्य निर्वाह निधीचा अंतिम परतावा, वेतन थकबाकी, निवृत्तीवेतन तसेच इतर आर्थिक लाभ वितरित केले जातात. प्रणाली बंद असल्याने कर्मचाऱ्यांच्या या सर्व हक्कांच्या बाबी अडथळ्यात आल्या आहेत.

संघटनेच्या महिला उपाध्यक्षा हेमलता गावित यांनी सांगितले की, "बी.डी.एस. प्रणाली बंद असल्याने अनेकांना त्यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक निधी वेळेवर मिळत नाही. कर्जाचे हप्ते, EMI, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि घरगुती जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास कर्मचाऱ्यांना प्रचंड आर्थिक ताण सहन करावा लागत आहे."

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच संबंधित प्रशासनिक अधिकाऱ्यांकडे बी.डी.एस. प्रणाली तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी केली आहे. संघटनेचे म्हणणे आहे की, तांत्रिक कारणांमुळे प्रणाली थांबवली असली तरी त्याचा फटका थेट कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याला बसत असून हा प्रकार अन्यायकारक आहे.

### 'मी विराट बोलतोय... ','मी डिव्हिएलियर्स बोलतोय...

## पाटीदारचा सिम कार्ड नंबर छत्तीसगढच्या तरुणाला मिळाला, अन मोठी धमाल उडाली

वृत्तसंस्था
■ रायपूर

छत्तीसगढमधील गावात एक अनोखी घटना घडली आहे. या गावातील एक मुलगा त्याच्या दुकानात बसला होता आणि अचानक त्याचा फोन वाजला आणि समोरून आवाज आला, हॅलो मी विराट कोहली बोलतोय. थोड्यावेळाने अजून एक कॉल आणि समोर म्हटलं गेलं मी ए.बी. डिव्हिलियर्स बोलतोय, काही वेळाने तिसरा कॉल आला आणि म्हटलं गेलं मी रजत पाटीदार बोलतोय. एखाद्या चित्रपटातील कथेसारखा वाटणारा हा प्रसंग या मुलासमोर कसा घडला,

छत्तीसगढच्या गारियाबाद जिल्ह्यातील मडगांव देवभोग येथील मुलाबरोबर चित्रपटात एखादा स्वप्नवत किस्सा घडतो, तसंच काहीसं घडलं. मनिष बीसी आणि खेमराज या दोन मित्रांना



रजत पाटीदारचा जुना फोन नंबर अलॉट करण्यात आला.२८ जूनला मनिषने रिलायन्स जिओचं नवं सिम कार्ड खरेदी केलं. नवं सिम कार्ड घेतल्यानंतर त्याने सर्व प्रक्रिया पूर्ण केली आणि व्हॉट्सएप डाऊनलोड केलं. त्यानंतर व्हॉट्सएपवर पाहतो तर काय रजत पाटीदारचा प्रोफाईल फोटो होता. त्यांना सुरूवातीला वाटलं की काहीतरी टेक्निकल प्रॉब्लेम असावा.पण नंतर लंडनहून विराट कोहली ,ए बी डिव्हिलियर्स यांचे फोन आल्यावर मनीष हडबडला.त्यानंतर हा प्रकार कळल्यावर पोलीस खाते जागे झाले आणि त्यांना घडलेला खरा प्रकार उघडकीस आला.

विराट कोहलीचा मोठा चाहता असलेल्या खेमराजने म्हटलं, मला चुकीच्या नंबरमुळे विराट कोहलीशी बोलण्याची संधी मिळाली.जिओने आपल्याला चुकून रजत पाटीदार याचा सिम नंबर दिल्याने ए बी डिव्हिलियर्स ,विराट कोहली यांच्यासारख्या महान क्रिकेटपटूंशी बोलता आले याबद्दल रिलायन्स जिओ मोबाईल कंपनीचे आभार मानावे तेव्हढे थोडेच आहेत ,असेही मनीष शेवटी म्हणाला.

## झोपडपट्टीतील शाळा, महाविद्यालयासाठी सढळ हस्ते मदतीचे जाहीर आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

महात्मा फुले एज्युकेशन ट्रस्ट-मुंबई ही संस्था धारावी झोपडपट्टीत मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू माध्यमांची पहिली ते दहावीपर्यंतच्या शाळांचे वर्ग याचबरोबर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय चालविते. महात्मा फुले एज्युकेशन ट्रस्ट ही संस्था धारावी झोपडपट्टीतील गोरगरिब मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कार्यरत आहे. या संस्थेस दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था व कंपन्यांनी सढळ हस्ते आर्थिक मदत करावी असे आवाहन या संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

आत्तापर्यंत या संस्थेच्या शाळा, महाविद्यालयामधून शिक्षण घेऊन असंख्य जण हे उच्चविद्याविभूषित झाले असून डॉक्टर, इंजिनियर्स, वकिल, उच्च पदस्थ सरकारी अधिकारी झालेले आहेत. आपण देणार

**तळागाळातील सर्वसामान्य माणसाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उत्तम संधी**

असलेली देणगी ही झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रम, गोरगरीब विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी असणार आहे. अशा या संस्थेस सध्या आर्थिक मदतीची गरज आहे. आपण देणारी देणगी ही आयकर करमुक्त आहे. आपली देणगी संस्थेच्या बॅंक खात्यावर जमा करावी. बॅंक खाते तपशिल :. Union Bank Of India, Branch-Dharavi, A/C number-564002010009092, IFSE : UBIN०५५६४०८.पत्ता -धारावी ,मुंबई -400017असा असून भ्रमणध्वनी क्रमांक 7738626262 यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन जिंकली पुण्याच्या धर्मेंद्रने

### उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही घेतला मॅरेथॉनमध्ये धावण्याचा आनंद

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाल्याचं पाहायला मिळालं. या मॅरेथॉनमध्ये एकनाथ शिंदे यांनी ठाणे पालिका मुख्यालय ते पाचपाखाडी येथील साईबाबा मंदिरापर्यंत मोठ्या उत्साहानं धावण्याचा आनंद घेतला. यादरम्यान एकनाथ शिंदे यांना धावताना पाहून स्पर्धकांमध्ये अनोखा उत्साह निर्माण झाल्याचं दिसून आलं. एकनाथ शिंदे यांच्यासोबत आयुक्त सौरभ राव देखील सोबत होते. दरम्यान, या स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या एएसआयच्या धर्मेंद्र यानं अव्वल स्थान पटकावलं. त्यानं ०१ तास ०७ मिनिटं आणि ४१ सेकंद वेळेसह २१ किमीचं अंतर पार केलं. तर, महिला गटात नाशिकच्या रविना गायकवाड यांनी ०१ तास २५ मिनिटं आणि ४६ सेकंद वेळ घेत शर्यत पूर्ण केली. या स्पर्धेत सुमारे 25 हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. तर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार



नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते विजेत्या धावपटूंना गौरविण्यात आलं.

**मॅरेथॉन स्पर्धा विविध १२ गटात :**
कोरोनापासून गेली पाच वर्षे खंडित झालेली ही स्पर्धा यंदा आबालवृद्धांच्या सहभागाने अत्यंत उत्साहात झाली. ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानं होणाऱ्या ३१ व्या वर्षा मॅरेथॉनचं रविवार सकाळी आयोजन करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरुष गटाच्या तर लता शिंदे यांनी महिला गटाच्या स्पर्धेला झेंडा दाखवला. त्यानंतर, टप्प्याटप्प्यानं एकूण १२ गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटात ज्येष्ठ नागरिक उत्साहानं सहभागी झाले होते. ठाणे वर्षा मॅरेथॉन स्पर्धा विविध १२ गटात झाली. विजेत्यांना एकूण १० लाख ३८ हजार ९०० रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांमध्ये वाढ करण्यात आली. २१ कि.मी स्पर्धेतील विजेत्यास एक लाखांचे रोख पारितोषिक, सन्माचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

**सरकारनं खेळाडूंना पाठबळ दिलंय - एकनाथ शिंदे :**
"खेलो इंडिया फिट इंडिया जसं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेळाडूंसाठी प्राधान्य दिलं आहे. खेळाडूंना केंद्र सरकारनं पाठबळ दिलेलं आहे. तसंच राज्य सरकारनं देखील खेळाडूंना पाठबळ दिलेलं आहे, " अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. वर्षा मॅरेथॉनचं आयोजन ठाणे महापालिकेनं उत्कृष्ट केलं आहे. यामध्ये २५ हजार धावक सहभागी झाले . या मॅरेथॉनमध्ये जिल्ह्यातून...जिल्ह्याच्या बाहेरून...सगळीकडून धावक येत असतात. टॅलेंट आहे, पोटेन्शिअल आहे, पण प्लॅटफॉर्मची गरज असते. म्हणून ठाणे महापालिका गेली ३१ वर्ष या वर्षा मॅरेथॉनच्या माध्यमातून खेळाडूंना प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देत आहे.

## 'गोड गणपतीच्या'च्या स्वागताला गोविंदांची सलामी



**मुंबई ।** अखिल चंदनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या 'गोड गणपती'चे रविवारी थाटात वाजतगाजत मिरवणुकीने मंडळाच्या मंडपात आगमन झाले.या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी गणेशभक्तांनी गिरगावच्या रस्त्यावर मोठी गर्दी केली होती. या बाप्पाला दहीहंडीचा सर्व करणाऱ्या गोविंदा पथकाने ६ थर लावून सलामी दिली.हे दृश्य पाहून गणेशभक्त आणि गोविंदाचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले होते.

